नूतन बालशिक्षण संघाची

# शिक्षणपत्रिका

## दीपावली विशेषांक

• वर्ष ८९ वे • अंक : सातवा व आठवा • ऑक्टो.- नोव्हें. २०२१ • देणगी मूल्य १५० रुपये




Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

## संस्था परिचय


| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक गुणवत्तेची गंगोत्री | प्रा. डॉ. आनन्द व्यंकटेश काटीकर | ६५ |
| कर्मवीरांच्या दूरदृष्टीची स्वप्नपूर्ती | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | ६९ |
| व्यायाम, देशभक्तीची शताब्दी | डॉ. किशोर फुले | ७५ |
| केशरकाकूंच्या कष्टाला आली फळे | प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर | ८० |
| मन, मेंदू, मनगटाला प्रोत्साहन | डॉ. वर्षा तोडमल | ८३ |
| ... एकेक पायरी सर करतांना | विद्या साताळकर | ८८ |
| उमरग्याच्या इतिहासातील सोनेरी पान | प्रा. डॉ. विनोद देवरकर | ९३ |
| कार्य पूर्णत्वास नेणे हे कुलव्रतच! | प्रा. डॉ. सविता दातार | ९८ |
| आगीलाही न जुमानणारी शाळा | जगदीश सदाशिव जोशी | १०३ |
| सागर किनारी फुलला १०० वर्षाचा ज्ञानवृक्ष | प्रभाकर आत्माराम राऊत | १०६ |
| अनेक शाखांचा वटवृक्ष... | प्रा. ज्योत्स्ना एकबोटे | १११ |
| एका तारेने उभी झाली शिक्षण संस्था | श्री. रजनीकांत श्रॉफ | ११७ |
| स्मशान ते नासा व्हाया नायजेरिया | प्रा. तुषार चांदवडकर | १२२ |
| वसुधैव कुटुंबकंम् मानणारी संस्था | श्री. के. पी. वायफळकर | १२९ |
| अनाथ विद्यार्थ्यांचे हक्काचे विद्यार्थीगृह | धनंजय तडवळकर | १३२ |


## आठवणीतील दिवाळी


| | | |
|---|---|---|
| दिवाळीत ठेवतो गरिबांची आठवण | विकास पाटील | १३६ |
| ती दिवाळी आज कुठे? | डॉ. लक्ष्मण शिवणेकर | १३८ |
| दिवाळीची मजा गेली तरीही... | प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर | १४३ |
| ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२१ निवडक दिनविशेष | प्रसाद भडसावळे | १४६ |




Scanned by CamScanner

संस्था परिचय

# कर्मवीरांच्या दूरदृष्टीची स्वप्नपूर्ती



## साताऱ्याची रयत शिक्षण संस्था

महाराष्ट्राच्या बहुजन समाजातील गोरगरीब, पददलित, डोंगरदऱ्यात आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या गुणवंत आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी. यासाठी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. गेली १०२ वर्षे संपूर्ण महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात संस्थेच्या माध्यमातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले जात आहेत. आज महाराष्ट्र संपूर्ण देशात शैक्षणिकदृष्ट्या प्रगत असलेला दिसून येतो. त्याला कर्मवीरांचे शैक्षणिक कार्यच कारणीभूत आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरत नाही.

लोकराजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कालखंडानंतर महाराष्ट्राच्या समाजजीवनात निर्माण झालेली अज्ञान आणि अंध:काराची कोंडी फोडून समाजातील सर्वसामान्य माणसांमध्ये ज्ञानाची लालसा निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी केले. त्यांच्याच कार्यातून आणि विचारातून प्रेरणा घेऊन कर्मवीरांनी या संस्थेची स्थापना



Scanned by CamScanner

केली. सर्वसामान्यांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन 'कमवा व शिका' ही अभिनव योजना ठरविली. आजच्या आधुनिक शिक्षणशास्त्रात ती मानदंड म्हणून मान्यता पावली आहे. जातिधर्माचा विचार मोडून काढून समतेचे, एकसंघतेचे, धर्मनिरपेक्षतेचे विचार समाजात रुजविण्याचे कार्य कर्मवीरांच्या या संस्थेने केले आहे.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयतच्या माध्यमातून जे रोपटे लावले, त्याचा ज्ञानवृक्ष आज १०२ वर्षे अनेकांना सावली देत आहे. जातीविरहित, स्वकमाईने शिक्षण घेण्याचा आनंद आज लाखो मुलांनी घेतला आणि घेत आहेत. कर्मवीरांची दूरदृष्टी उभ्या महाराष्ट्राला प्रचंड उपयोगी पडली. रयत शिक्षण संस्था आधुनिक काळात त्यामुळेच प्रगतीवर आहे.**

कर्मवीरांनी व्हॉलंटरी शाळांच्या माध्यमातून शिक्षक आणि शिक्षण वाडीवस्तीपर्यंत पोहोचविले. त्यांच्या 'समताधिष्ठीत शिक्षण' या मूल्याने भारलेला शिक्षक हा परिवर्तनाचा शिल्पकार ठरला. महाराष्ट्रातील अविकसित, दुर्गम, दुष्काळग्रस्त, आदिवासी भागात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून 'गाव तिथे शाळा' हा नवा प्रयोग महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात राबविला.

त्यांनी सन १९१९ मध्ये काले येथे संस्थेची स्थापना केली. १९२४ ला संस्थेचे स्थलांतर सातारा येथे केले. १९२७ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हस्ते कर्मवीरांनी आपल्या वसतिगृहाचे ''राजर्षी शाहू बोर्डिंग हाऊस'' असे नामकरण केले. तेव्हा गांधीजींनी अण्णांना विचारले – 'वसतिगृहाला नाव देण्यासाठी शाहू महाराजांनी तुम्हाला किती पैसे दिले.' त्यावेळी अण्णा म्हणाले, महाराजांनी पैसे दिले नाहीत परंतु बहुजन समाजाच्या शिक्षणाची प्रेरणा दिली'. या नामकरण समारंभात गांधीजींनी कर्मवीरांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. 'भाऊराव! साबरमती आश्रमात मी हा प्रयोग केला मात्र तो यशस्वी झाला नाही. तुम्ही मात्र तो येथे यशस्वी करून दाखविला. तुमच्या कार्याला माझे आशीर्वाद.'

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी वसतिगृहयुक्त शिक्षणाला श्रमाची जोड दिली. 'कमवा आणि शिका' हा अभिनव प्रयोग आपल्या वसतिगृहयुक्त शिक्षणामध्ये केला.

प्राचीन काळी आश्रमात असताना श्रीकृष्णालासुध्दा लाकडे फोडावी लागली. सुदाम्याला गाईचे दूध काढावे लागले, आश्रमातील मुलांना गोठा साफ करावा लागत असे. याठिकाणी कोण रजपूत आणि कोण सामान्य अशाप्रकारचा भेदभाव केला जात नसे. कर्मवीरांनीसुध्दा हेच सूत्र आपल्या वसतिगृहयुक्त शिक्षणामध्ये अंमलात आणले. समाजात राहणाऱ्या गोरगरीब जनतेला केवळ पैसे नाहीत म्हणून शिक्षणापासून वंचित रहावे लागू नये यासाठी सर्व जातीधर्मातील मुलांसाठी वसतिगृहयुक्त शिक्षणाबरोबरच वसतिगृहात येणाऱ्या प्रत्येक मुलाला काही वेळ काम दिले. त्यामध्ये स्वयंपाक करणे, स्वच्छता करणे, यासारखी कामे दिली जात असत. यातून सहजीवनाच्या संस्काराबरोबरच जातिधर्म विरहित शिक्षण देणे, शिक्षणाला श्रमाची जोड देणे ही भूमिका होती. अण्णांच्या या कार्यामध्ये त्यांची पत्नी रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी अखेरपर्यंत साथ दिली. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडे असणारे २०० तोळे सोने कर्मवीरांच्या कार्याला अत्यंत खुशीने देऊन टाकले. अगदी आपल्या सौभाग्याचा अलंकार मंगळसूत्रसुध्दा कर्मवीरांच्या कार्यासाठी दिले. वसतिगृहात राहणाऱ्या प्रत्येक मुलाला आईची माया दिली. कर्मवीर अण्णा अनेकवेळा संस्थेच्या कामानिमित्त बाहेरगावी जात. अशावेळी त्या मुलांच्या संगोपनाची पूर्ण जबाबदारी त्या स्वतःच्या खांद्यावर घेत.



Scanned by CamScanner

शिक्षणाचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये असणाऱ्या सुप्त कलागुणांचा शोध घेणे. त्या कलागुणांचे संवर्धन करणे आणि याच कलागुणांना योग्य वेळी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. यामाध्यमातूनच ज्ञानाने परिपूर्ण असणारा सक्षम विद्यार्थी घडू शकतो. या विचारावर कर्मवीरांची नितांत श्रध्दा होती. याबरोबरच शिक्षणाचा खरा अर्थ चांगल्या मूल्यांची प्रतिष्ठापना करणे हा आहे. ही मूल्ये व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनात ऊर्जा देण्याचे काम करीत असतात. कर्मवीरांच्या शिक्षण प्रणालीत स्वाभिमान, समता, स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठा या मूल्यांना मध्यवर्ती स्थान देण्यात आले होते. स्वत्वाच्या जाणिवेतून स्वाभिमान, सहजीवनाच्या माध्यमातून समता, कष्ट करून शिक्षण मिळविण्याच्या संकल्पनेतून स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये कर्मवीरांनी समाजात रूजविली आणि महाराष्ट्राला एक नवा चेहरा बहाल केला.


कर्मवीर भाऊराव पाटील

अस्पृश्यता आणि जातीभेद याविषयी अण्णांच्या मनात बालपणापासून चीड होती. कोणत्याही माणसावर अन्याय झालेला त्यांना कधीही सहन होत नसे. एकदा एका अस्पृश्य मुलाबरोबर आडावर पाणी पिण्यासाठी अण्णा गेले होते. त्या आडावर पाणी भरणारे लोक अण्णांना पिण्यासाठी पाणी देण्यास तयार झाले पण त्यांच्याबरोबर असणाऱ्या अस्पृश्य मुलाला पाणी दिल्याने तो आड बाटणार आहे म्हणून त्याला मात्र पाणी देण्यास ते लोक नकार देत होते. हे पाहून अण्णांना चीड आली आणि त्यांनी तो रहाटच 'आता प्या पाणी, कसं पिताय ते बघतोच मी' असे म्हणून मोडून टाकला.

एकदा अण्णा कोल्हापूरवरून इस्लामपूरला सुट्टीत आले असताना एका प्राथमिक शाळेच्या पुढून जात असताना वर्गात सर्व मुले बसलेली दिसली. गुरूजी त्यांना शिकवताहेत परंतु एक मुलगा मात्र वर्गाच्या बाहेर बसून गुरूजींचे शब्द एकाग्रतेने ऐकतो आहे हे दृश्य पाहिल्यानंतर अण्णा तेथे त्या मुलाच्या जवळ गेले आणि गुरूजींच्यावर ओरडले. 'याच मुलाला इतक्या दूर का बसवलेले आहे?' असे गुरूजींना विचारून त्यांची मते खोडून काढली. 'हा मुलगा अस्पृश्य आहे त्यामुळे तो वर्गात बसू शकत नाही.' या गुरूजींच्या उत्तराने अण्णांचे समाधान झाले नाही आणि त्यांनी त्या मुलाला 'घाबरू नकोस मी तुझ्या शाळेची व्यवस्था करतो.' म्हणून त्याला घेऊन गेले तो विद्यार्थी म्हणजे ज्ञानदेव घोलप. पुढे विधान परिषद सदस्य झाला आणि अण्णांचा निष्ठावंत कार्यकर्ता बनला.

आधुनिक काळाची गरज ओळखून शिक्षण विस्ताराबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी संस्था आजही कटिबध्द आहे. म्हणूनच संगणक शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, इंग्रजी संभाषण मार्गदर्शन, बायोटेक्नॉलॉजी, व्यवसायाभिमुख शिक्षण, नॅनो टेक्नॉलॉजी, कृषी संशोधन केंद्र, बी.पी.ओ. सेंटर, रयत विज्ञान परिषद, राजीव गांधी सायन्स सेंटर यासारखे कालानुरूप तसेच समाजाभिमुख अभ्यासक्रम संस्थेने सुरू केले आहेत.

आजच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात समाजात निर्माण झालेल्या प्रचंड स्पर्धेला अत्यंत आत्मविश्वासाने तोंड देणारा विद्यार्थी रयतमधून निर्माण झाला पाहिजे,



Scanned by CamScanner

यासाठी शिक्षणाच्या विस्तारीकरणाबरोबरच संस्थेने नेहमीच गुणवत्तेला प्राधान्य दिले आहे. अत्यंत महत्वाची दूरदृष्टी असलेले राष्ट्रीय नेतृत्व म्हणून ज्यांना राजमान्यता आणि समाजमान्यता प्राप्त झाली आहे असे शरद पवार यांचे नेतृत्व अध्यक्ष म्हणून संस्थेला लाभले आहे. विस्तारीकरणाला गुणवत्तेची झालर दिली तर रयतमधील विद्यार्थी सक्षमपणे पुढे जाणार आहे, हा द्रष्टा विचार करून संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. ही घटना महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला भूषणावह अशी आहे. संस्थेमध्ये राबविलेले अनेक उपक्रम महाराष्ट्र शासनाने 'पायलट प्रोजेक्ट' म्हणून राबविले आहेत. चांगला विद्यार्थी घडविणे हा ध्यास संस्थेने नेहमीच घेतला आहे.

कर्मवीरांनी सुरू केलेली शैक्षणिक चळवळ आज गतिमान झाली आहे. काळ मोठया झपाटयाने बदलतो आहे. ज्ञानाचे संदर्भ बदलत आहेत. अशावेळी समाजातील गोरगरिबांची मुले सक्षमपणे पुढे न्यावयाची असतील तर काळाच्या गरजा ओळखून रयत शिक्षण संस्थेला वाटचाल करावी लागेल. विद्यार्थी हा सामाजिक क्षेत्रात सर्वोत्तम असला पाहिजे हा ध्यास आणि आग्रह शरद पवार यांनी नेहमीच धरला आहे. लहान वयात विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात, त्यांच्यामध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी आणि भविष्यात या विद्यार्थ्यांकडून वैज्ञानिक क्षेत्रातील सर्वोत्तम संशोधन व्हावे आणि पर्यायाने राष्ट्रीय विकासात रयतच्या विद्यार्थ्यांचे महत्वपूर्ण योगदान राहावे यासाठी संस्थेच्या माध्यमातून रयत विज्ञान परिषदेची स्थापना करून आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या डॉ.रघुनाथ माशेलकर, डॉ. अनिल काकोडकर यासारख्या शास्त्रज्ञांना विद्यार्थ्यांच्या समोर आणून आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

आजचा कालखंड हा माहिती तंत्रज्ञानाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. संगणक शिक्षण ही आज काळाची गरज झाली आहे. भविष्यात संगणक शिक्षणापासून विद्यार्थी दूर राहिला तर संगणक साक्षर आणि संगणक निरक्षर असे दोन वर्ग समाजात निर्माण होतील ही दरी नष्ट करण्यासाठी श्री. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने प्रत्येक विद्यार्थ्यास संगणक शिक्षण हा महत्वाकांक्षी प्रकल्प यशस्वीपणे राबविला आहे. आज संस्थेच्या प्रत्येक शाखेत संगणक प्रयोगशाळा निर्माण केली असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

संस्थेने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक विकासासाठी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित शिक्षण देऊन प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाताला काम मिळाले पाहिजे, तो स्वावलंबी झाला पाहिजे यासाठी महाराष्ट्र स्कील डेव्हलपमेंट कार्पोरेशन सोसायटी आणि इतर शैक्षणिक व औद्योगिक संस्थांशी सहकार्य करार करण्याचे धोरण स्वीकारले आहे. या माध्यमातून चांगली पिढी निर्माण होवू शकेल.

सामाजिक बांधिलकी जोपासणारा महत्वाचा प्रकल्प म्हणजे महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेवून त्यांच्या अंधःकारमय जीवनाला ज्ञानाचा प्रकाश दाखविणारा महत्वाकांक्षी प्रकल्प होय. निसर्गाच्या अवकृपेने उध्वस्त झालेला शेतकरी आत्महत्या करत होता. शेतकऱ्यांची घरे उघडयावर येत होती. त्या कुटुंबाला आधार देणारा घटक म्हणून संस्थेने एक महत्वाकांक्षी निर्णय घेतला तो म्हणजेच ज्या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे त्याच्या कुटुंबातील मुलांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांच्या आवडीनुसार पूर्ण शिक्षण दिले जाईल त्यासाठी शाहू बोर्डिंग हाऊसचे पुनरूज्जीवन केले गेले.

संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संस्थेच्या विकासासाठी निश्चित स्वरूपाची आखणी करून काही महत्वाचे उपक्रम आपण हाती घेतले आहेत. टाटा टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून सायन्स टेक्नॉलॉजी पार्कची तीन केंद्रे सातारा, हडपसर व खारघर या ठिकाणी उभी करून आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त विद्यार्थी घडविण्याचे



Scanned by CamScanner

काम सुरू आहे. याचबरोबर रूकडी या ठिकाणी संस्थेच्या असलेल्या १०० एकर जागेमध्ये शेती फार्म विकसित केला आहे. याठिकाणी कर्मवीर भाऊराव पाटील कृषी संशोधन केंद्राची स्थापना करून या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान देण्याचा प्रयत्न केला जात आहे. चांगला विद्यार्थी घडवायचा असेल तर जागतिक पातळीवर ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे बदल संस्थेतील प्रत्येक सेवक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. यासाठी संस्थेने कुंभोज या ठिकाणी अत्याधुनिक व सर्व सुविधांनीयुक्त अशा 'ट्रेनिंग सेंटरची' उभारणी केली आहे.

आजच्या कालखंडात शिक्षण प्रक्रिया गतिमान करण्यासाठी संस्थेने स्वतःचे स्वतंत्र स्टुडीओ सुरू केले असून या माध्यमातून विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने एकाच वेळी संस्थेतील लाखो विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जात आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण विद्यापीठाचे स्वप्न पाहिले होते. कर्मवीरांचे हे स्वप्न 'क्लस्टर युनिव्हर्सिटी'च्या रूपाने नजिकच्या काळात पूर्ण होईल. यामाध्यमातून उच्च शिक्षणाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला जाईल.

आजही माध्यमिक स्तरावर संस्थेच्या १७१ शाखा दुर्बल आहेत. या छोटया शाखांमध्ये अद्ययावत सायन्स प्रयोगशाळा, स्पोर्टस् सुविधा, ग्रंथालय, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, इमारत दुरूस्ती हे भौतिक सुविधांचे उपक्रम हाती घेतले आहेत. याशिवाय सर्वच प्राथमिक विद्यालयांत इंग्लिश कम्युनिकेशन स्कील, स्मार्ट बोर्ड, गणित प्रयोगशाळा निर्माण केल्या जाणार आहेत तर ३०० शाखांमध्ये मिनी सायन्स सेंटरची उभारणी केली जाणार आहे.

महाविद्यालयीन स्तरावर आज संस्थेची सहा महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. या शताब्दी वर्षात छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, एस.जी.एम. कॉलेज, कराड, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय वाशी, नवी मुंबई ही सहा महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. सेंटर फॉर एक्सलन्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक जगाशी जोडण्यासाठी बँकिंग अॅन्ड फायनान्स, बायोटेक्नॉलॉजी सेंटरची निर्मिती केली जात आहे. त्याचबरोबरच विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी संस्थेने आर.आय.आर.डी. रिसर्च सेंटरची उभारणी केली आहे. ते अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. तसेच सहा ॲग्रिकलचर प्रकल्पांची उद्घाटने, २ टिश्यूकल्चर लॅबचे उद्घाटन आणि १५ ॲग्रिकल्चर सेंटरची उभारणी केली जाणार आहे.

केंद्रशासन व राज्यशासन पुरस्कृत कौशल्य विकास कोर्सेस आणि खासगी कंपन्यांच्या सहकार्य करारातून कौशल्य विकास अभ्यास राबविले जात आहेत. पंतप्रधान कौशल्य विकास योजना, महाराष्ट्र राज्य स्कील डेव्हलपमेंट सोसायटी, एन.एस.क्यू.एफ. स्कील प्रोजेक्ट, बी.व्ही.जी. ग्रुपच्या माध्यमातून बी.एस्सी फॅकल्टी सर्व्हिसेस, हाऊस किपिंग, बॉश पुरस्कृत ब्रीज कोर्सेस, कुपर कार्पोरेशन पुरस्कृत कोर्सेस, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, महेंद्रा प्राईड स्कूल, आय.सी.आय. ॲकडेमी फॉर स्कील पुरस्कृत कोर्सेस, जैन इरिगेशन, ल्युपिन, टी.सी.एस यासारख्या राष्ट्रीय मान्यताप्राप्त संस्थांच्या सहकार्यातून विविध कोर्सेस राबवून संस्था एका नव्या दिशेने शैक्षणिक वाटचाल करीत आहे.

संस्थेमध्ये स्पोर्टस कॉम्प्लेक्स उभारली जाणार आहेत. ही कॉम्प्लेक्स उभारून विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन दिले जाईल, त्याचबरोबर छत्रपती शिवाजी कॉलेज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात एम.पी.एस.सी व यु.पी.एस.सीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. संस्थेच्या



Scanned by CamScanner

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामधून सुमारे ११०० प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्राच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये आपली जबाबदारी पूर्ण करीत आहेत. यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे होस्टेल उभारणीचे काम सुरू आहे. तर नगर या ठिकाणी महिलांसाठी मिलिटरी ऑफिसर होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केंद्र उभारणीचे काम सुरू आहे. याशिवाय पोलीस व सैन्य भरतीचे मार्गदर्शन केंद्र अपशिंगे या ठिकाणी सुरू केले जात आहे. श्रीरामपूर येथील संस्थेच्या महाविद्यालयात डिफेन्स डिग्री कोर्स सुरू करून विद्यार्थ्यांसाठी एक नवे दालन खुले करीत आहोत.

प्रशासकीय क्षेत्राबरोबरच महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, औद्योगिक क्षेत्रात अनेक विद्यार्थी आपले कर्तव्य निष्ठेने बजावत आहेत. बॅरिस्टर पी. जी. पाटील, शंकरराव खरात, प्राचार्य शिवाजीराव भोसले, डॉ. एस. एम. पठाण यांच्यासारखे अनेक कुलगुरू, डॉ.पतंगराव कदम, रामशेठ ठाकूर यांच्यासारख्या औद्योगिक क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या व्यक्तिंनी, संस्थेमध्ये ज्ञानार्जन करून समाजाच्या विकासासाठी योगदान दिले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाच्या विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत. बी. व्होक च्या माध्यमातून संस्थेच्या १४ महाविद्यालयांना मास कम्युनिकेशन, मेडिकल प्लॅन्ट ग्रोअर, फूड टेक्नॉलॉजी, फुड प्रोसेसिंग अॅन्ड क्वॉलिटी मॅनेजमेंट, फायनान्सियल मार्केटींग, सॉफ्टवेअर डेव्हलपिंग, अॅग्रीकल्चर, हॉटेल मॅनेजमेंट, मिडीया अॅन्ड इंटरटेनमेंट, फौंड्री टेक्नॉलॉजी, बी.व्होक इन नर्सिंग यासारखे विविध पदवी कोर्सेस सुरू केले जात आहेत. खऱ्या अर्थाने कवी विठ्ठल वाघ यांनी लिहिलेल्या

''रयतेमधुनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे.

वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे.''

या काव्यपंक्तीची प्रचिती भविष्यात निश्चित स्वरूपात येईल त्यादिशेने संस्थेची वाटचाल सुरू आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील हे स्वप्न पाहणारे होते. ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अहोरात्र झटणारे कार्यकर्ते होते. भुकेल्या माणसापुढे जाताना परमेश्वरालाही भाकरीचे रूप घेऊन जावे लागते. ज्ञानासाठी भुकेल्या विद्यार्थ्यांसमोर जाताना आपणही ज्ञानाची शिदोरी घेऊन जाऊया. ती घेऊन गेलो तरच आपणाकडून आदर्श समाजाची निर्मिती होईल. हा आदर्श समाज निर्माण करणे हाच एकमेव ध्येयवाद उराशी बाळगून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले जीवन व्यतीत केले. आज महाराष्ट्राच्या समाजजीवनात ज्ञानाच्या पातळीवर जी एक उंची निर्माण झाली आहे. त्यामागे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आणि त्यांच्या नंतर समाजाच्या गरजा ओळखून संस्थेने राबविलेले समाजोपयोगी विविध उपक्रम यामध्येच आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरत नाही.

***



**लेखक : डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
प्राचार्य,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय,
सातारा



Scanned by CamScanner

ISBN : 978-81-948864-6-4

आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरुप व वाटचाल
Aadivasi Sahitya : Sankalpana, Svarup Va Vatchal

संपादक : प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, डॉ.पांडुरंग भोसले,
डॉ.सचिन रुपनर, डॉ. पौर्णिमा कोल्हे

सर्व हक्क : डॉ.पांडुरंग भोसले
भ्रमणध्वनी : ९४२०९७७८२२, ९४२३२५५०३८
ई-मेल : sachinrupnar@gmail.com

प्रकाशक :

सौ.सोनी अहिरे - मोरे

आविष्कार प्रकाशन,
सोमाटणे, तळेगाव दाभाडे, पुणे-४१२१०६
भ्रमणध्वनी : ९९६०१६९९७४, ८३९००४७१७४
ई-मेल : aavishkarprakashan@gmail.com

अक्षरजुळणी/मुद्रक :
श्री. मनोज घोडके, श्री. दीपक मोरे
भ्रमणध्वनी : ८३९००४७१७४, ९९६०१६९९७४

मुखपृष्ठ : श्रीराम रसाळ

प्रथमावृत्ती : ५ सप्टेंबर २०२१

मूल्य : रू. ४९०/-

---

* या पुस्तकात समाविष्ट असलेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. आदिवासी : समाज, साहित्य आणि समकालीन आव्हाने | – प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे<br>प्रा. निरंजन फरांदे | १३–२४ |
| २. आदिवासी कवितेतील स्त्री | – डॉ. सौ. शोभा इंगवले | २५–३५ |
| ३. देशीवाद आणि मराठी आदिवासी कविता | – डॉ. पांडुरंग गायकवाड | ३६–४५ |
| ४. आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि वाटचाल | – डॉ. राजेंद्र खंदारे | ४६–६६ |
| ५. आदिवासी साहित्याचे स्वरूप | – डॉ. ज्योती परब | ६७–७९ |
| ६. आदिवासी साहित्य : स्वरूप व संकल्पना | – डॉ. संदीप सांगळे | ८०–९० |
| ७. आदिवासी साहित्याचे स्वरूपविशेष | – डॉ. राजेंद्र बावळे | ९१–९४ |
| ८. आदिवासी साहित्याची संकल्पना | – प्रा. भारत बांडे | ९५–१०२ |
| ९. आदिवासी साहित्याचे स्वरूप | – डॉ. कोमल कुंदप | १०३–१०९ |
| १०. साठोत्तरी आदिवासी साहित्य | – प्रा. योगेश शेळके | ११०–११७ |
| ११. आदिवासी साहित्य आणि संस्कृती | – डॉ. संजय शिंदे | ११८–१२९ |
| १२. आंध आदिवासी समाज : संस्कृती आणि बोलीभाषा | – डॉ. सखाराम डाखोरे | १३०–१३८ |
| १३. आदिवासी साहित्य : प्रेरणा आणि महत्त्व | – डॉ. वर्षा देसाई–रुपनर | १३९–१४७ |
| १४. आदिवासी साहित्याची प्रेरणा व स्वरूप | – डॉ. शिवदास इंदोरकर | १४८–१५७ |
| १५. आदिवासी साहित्याची गरज | – सौ. शितल ढगे | १५८–१६६ |
| १६. आदिवासी साहित्य : मीमांसा | – श्री. बाबाराव मडावी | १६७–१७० |
| १७. आदिवासी स्त्रियांच्या समस्या : कारणे आणि उपाय | – डॉ. पौर्णिमा कोल्हे | १७१–१७७ |
| १८. आदिवासी कविता : स्वरुप व प्रेरणा | – प्रा. चिंतामण धिंदळे | १७८–१८६ |
| १९. आदिवासी कविता : एक दृष्टिक्षेप | – प्रा. ज्ञानेश्वर तिखे | १८७–१९४ |
| २०. आदिवासी कवितेमधून प्रकटणारे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ | – डॉ. अतुल चौरे | १९५–१९९ |


Scanned by CamScanner

१.

# आदिवासी : समाज, साहित्य आणि समकालीन आव्हाने

प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, सातारा
प्रा.निरंजन फरांदे, सातारा

**प्रास्ताविक :**

भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाकडे पाहिले असता 'आदिवासी समाज' हा या देशातील मूलनिवासी समाज असल्याचे दिसून येते. परंतु आर्यांच्या भारतातील आगमनानंतर भारतीय समाजाचा प्रवाह बदलणाऱ्या आर्य-अनार्य संघर्षात आर्यांनी अनार्य मूलनिवासींचा पराभव केला. आपल्या मूळ संस्कृतीला पारखे झालेल्या अनार्यांनी अखेर डोंगरदऱ्या, अरण्याचा आश्रय घेतला. तेव्हापासून आजअखेर हजारो वर्षे हा समाज निसर्गाच्या सान्निध्यात आपल्या स्वतंत्र सामाजिक सांस्कृतिक परंपरांसह जीवन जगत असलेला आपल्याला दिसून येतो. नागर संस्कृतीकडून होणारे शोषण, अवहेलना, उपेक्षा या सामाजिक समस्यांबरोबरच दारिद्र्य -कुपोषणांसारख्या गंभीर प्रश्नांचे ओझे घेऊन शतकानुशतके या समाजाचा जगण्यासाठीचा संघर्ष सुरू आहे.

एकोणिसाव्या शतकात सुरू झालेल्या प्रबोधन चळवळींनंतर जगभरात सामाजिक, सांस्कृतिक, धर्मक्षेत्रात झालेल्या उलथापालथी सबंध मानव समूहाला नवविचार देणाऱ्या ठरल्या. भारतीय समाजव्यवस्था यामुळे प्रभावित झाली.

आदिवासी समाजावरही आधुनिक विचारांचा थोड्याबहुत प्रमाणात परिणाम झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासींचा सहभाग लक्षणीय ठरला. पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल झाले. आदिवासींमध्ये जागृती होऊ लागली. स्वातंत्र्योत्तर काळातील संक्रमण अवस्थेच्या परिणामातून भारतीय वाङ्मयात नवनव्या प्रवाहांचा उदय झाला. मराठी साहित्यातही शेतकरी, दलित, आदिवासी, स्त्रिया, भटके-विमुक्त, कामगार या वर्गातील नवलेखक नव्या जाणिवांच्यासह लेखन करू लागले. यातूनच साठोत्तर मराठी वाङ्मयातील एक महत्त्वाचा प्रवाह म्हणून आदिवासी वाङ्मयप्रवाह पुढे आला. आज हा प्रवाह मराठी साहित्यात चांगलाच स्थिरावलेला असून प्रस्थापित साहित्यानेही



Scanned by CamScanner

या प्रवाहाची दखल घेतली आहे. आदिवासी साहित्य परिषद, आदिवासी साहित्य संमेलने यामुळे आदिवासी साहित्याचा विकास होत आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी समाज, साहित्य आणि त्याच्या समोरील समकालीन आव्हानांचा आढावा घेण्याचे प्रयोजन आहे.

**आदिवासी कोण? :**

आदिवासी नेमके कोणाला म्हणावे याची चर्चा विनायक तुमराम यांनी विस्तृत स्वरूपात केली आहे. ''एका विशिष्ट पर्यावरणात राहणारा समान बोली-भाषा बोलणारा, समान जीवन पद्धतींनी नटलेला, समान देवदेवतांना मानणारा; परंतु अक्षरओळख नसलेला एकजिनसी मानवसमूह म्हणजे आदिवासी''[१] असे तुमराम यांनी म्हटले आहे. तर महात्मा फुले यांच्या

**''गोंड भिल्ल क्षेत्री होते मुळी धनी**
**इराणी मागुनी /आले येथे**
**शूर भिल्ल कोळी शराने - तोडीले**
**हाकलून दिले रानोवनी''**

या अखंडाचा संदर्भ देऊन अनेक आदिवासी साहित्य अभ्यासकांनी आदिवासी हा आर्यपूर्व मानवसमूह आहे, तो या भूमीचा मूळ मालक आहे, तोच खरा क्षेत्राधिपती आहे अशी मांडणी केली आहे. एकंदर आदिवासी म्हणजे हजारो वर्षांपासून निसर्गाच्या सान्निध्यात पर्यावरणाची एकरूप होऊन आपल्या विशिष्ट भाषा, जीवनपद्धती, संस्कृती आणि प्रथा-परंपरांसह जीवन जगणारा आदिम मानवसमूह आहे हे स्पष्ट होते.

**आदिवासी समाज :**

आदिवासींच्या दैन्यावस्थेचा प्रारंभ आर्य-अनार्य संघर्षातून झाला याचे उल्लेख प्रास्ताविकात आले आहेत. खऱ्या अर्थाने आदिवासींच्या अस्तित्वाची दखल स्वातंत्र्यानंतर भारतात संविधानाचा अंमल सुरू झाल्यानंतर घेतली गेली.

''महाराष्ट्रात गोंडवन, सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांच्या परिसरात आदिवासींच्या वस्त्या आणि पाडे आहेत. अकोला, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, बुलढाणा, यवतमाळ, अहमदनगर, पुणे, औरंगाबाद, जालना, ठाणे, रायगड, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्याच्या काही



Scanned by CamScanner

भागांमध्ये आदिवासी जमाती पूर्वीपासून वास्तव्य करून रहात आहेत. त्यामध्ये गोंड, कोरकू, बंजारा, महादेव कोळी, ठाकूर, भिल्ल, राजगोंड, हलबा, परधान, कवर, कोलाम, पावरा, तडवी, लमाणी, वारली, कातकरी, कोकणा, ठाकर, मल्हारकोळी, धोंडीया, दुबळा, गावित, मावची धनका, काथोडी अशा ४१ जमातींचा समावेश आहे.''[२] यातील बहुतांश समाज आजही पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहेत. शिकार, मध, फळे, वनौषधी, हंगामी शेती, मोलमजुरी, कष्टाची कामे यांवरच या समाजाचा उदरनिर्वाह चालत असतो.

जागतिकीकरणानंतर वाढलेले शहरीकरण व उद्योगधंदे यामुळे काही प्रमाणात आदिवासी समाजास रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी त्या दुय्यम दर्जाच्या आहेत. आदिवासींच्या भाषा, संस्कृती, जीवनपद्धतींमध्ये असलेल्या वैविध्यामुळे हा समाज नागरी समाजसंस्कृतीशी सहजगत्या जुळवून घेऊ शकत नाही. त्यामुळे कष्टाची, मोलमजुरीची आणि अंगमेहनतीची कामेच आदिवासींच्या वाटयाला अधिक प्रमाणात येताना दिसतात.

भौगोलिकदृष्ट्या शहरांच्या जवळ असलेल्या आदिवासी वाडया-वस्त्यांवर काही प्रमाणात शिक्षणादी नागरी सुविधा उपलब्ध झाल्यामुळे त्यांचे जीवनमान बदलताना दिसते. परंतु मूलभूत सांस्कृतिक फरक आणि जागतिकीकरणानंतर बदललेल्या वर्तमानाचा आदिवासी समाजाला अन्वयार्थ न लावता आल्यामुळे अनेक समस्यांना या समाजाला तोंड द्यावे लागत आहे. भाषा, धर्म, अर्थ, राजकारण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात हा समाज चाचपडताना दिसत आहे.

शहरापासून दूर असलेल्या आणि पारंपरिक जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे प्रश्न याहूनही निराळे आहेत. आदिवासींच्या जीवनाचा क्षेत्रीय अभ्यास करणाऱ्या अभ्यासक माधुरी साकुळकर यांनी आदिवासींच्या समस्यांची भीषणता स्पष्ट करताना काही निरीक्षणे नोंदवली आहेत. ''आदिवासींचे जीवन रानावनात नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या वनस्पतींप्रमाणेच आहे. त्यांचे समग्र जीवन जसे वनांवर अवलंबून असते तसेच त्यांची जीवनशैलीही वनांशी सुसंगत असते. परंतु जेव्हापासून जंगल कायदा आला आणि जंगलातील लाकडे, मध, डिंक, मोह फुले, तेंदूची पाने तोडण्यावर बंदी आली तेव्हापासून या जीवनशैलीत खंड पडला. शिकार करण्यावर बंदी आल्यामुळे आदिवासींचे हाल सुरू झाले. डोंगर, दऱ्याखोऱ्यात, अरण्यात राहणाऱ्या आदिवासींच्या जगण्याची साधने



Scanned by CamScanner

हिरावली गेली. त्यामुळे त्यांच्या दैन्याला सुरुवात झाली. एरव्ही जंगलाचा राजा असलेला आदिवासी वनअधिकाऱ्यांकडून नागविला जाऊ लागला.''[३]

जगण्याची ही नैसर्गिक साधने हिरावली गेल्यामुळे आपल्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी आदिवासी पुरुषांचे स्थलांतर होऊ लागले. छत्तीसगड राज्यातील आदिवासी पुरुष रोजगारासाठी अंदमानपर्यंत जाऊ लागले. काही सिमला, मसुरी या भागात गेले. परंतु या पुरुषांचे माघारी येण्याचे प्रमाण खूप कमी आहे. असे निरीक्षण माधुरी साकुळकर यांनी नोंदवले आहे. नागपूर भागामध्ये सुरु असलेल्या खाणींमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज काम करत असलेला दिसतो. खाणमालक फसवणूक, लुबाडणूक करून या समाजाचे शोषण करतात. खाणीमध्ये सुरुंगाच्या स्फोटामुळे अपंगत्व आलेले अनेक आदिवासी या भागात आहेत.

**आदिवासी स्त्रियांचे जीवन :**

आदिवासींची शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे आणि यातून जेमतेम खाण्यापुरते धान्य मिळत असल्यामुळे पावसाळ्याव्यतिरिक्तचे सात-आठ महिने आदिवासी कुटुंबातील कर्ते पुरुष जमीनदार, बांधकाम व्यावसायिक, खाणी इ. ठिकाणी कामासाठी राहतात. या काळात लहान मुले आणि आदिवासी स्त्रिया मात्र आपल्या गावीच राहून छोटी-मोठी मोलमजुरीची कामे करतात.

''आदिवासी मुलींच्या तर आणखी वेगळ्या समस्या आहेत. १२ ते १८ वयोगटातील मुली गरिबीमुळे, चांगल्या जगण्याच्या आशेने, शहरी जीवनाच्या आकर्षणामुळे मुंबई, दिल्ली, गोवा अशा शहरात मोठमोठ्या शहरांमध्ये घरकामासाठी जातात. फक्त दिल्लीत छत्तीसगडमधून घरकामासाठी आलेल्या जवळपास एक लाख मुली आहेत. दरवर्षी प्रत्येक आदिवासी तालुक्यातून जवळपास पाच हजार मुली मुंबई, दिल्ली, गोव्याला जातात.''[४]

आदिवासी मुलींना उच्चभ्रू जीवनाची स्वप्ने दाखवून शहराकडे नेणाऱ्या दलालांचे धंदे खूप तेजीत असून जॉब प्लेसमेंटच्या गोंडस नावाखाली अशा शेकडो एजन्सीज मोठ्या शहरांमध्ये कार्यरत आहेत. या एजन्सीजकडून आदिवासी मुलींचे मोठे आर्थिक व लैंगिक शोषण होत असल्याचे भीषण वास्तव माधुरी साकुळकर यांच्या क्षेत्रीय अभ्यासात पुढे आले आहे. वर्तमानात वेगाने बदलणाऱ्या सामाजिक-सांस्कृतिक अवकाशात आदिवासींचे प्रश्न अधिक जटिल बनण्याचा



Scanned by CamScanner

धोका आहे.

**आदिवासी साहित्य :**

आदिवासी साहित्य म्हणजे काय? याचे समर्पक विवेचन डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले आहे. ''आदिवासींच्या संदर्भातील भौगोलिक, सामाजिक, वांशिक व धार्मिक पृथकतेची जाणीव व्यक्त करणाऱ्या मराठी साहित्यास आदिवासी साहित्य असे म्हणता येईल. थोडक्यात 'आदिवासी' हा प्रतिपाद्य विषय आणि 'आदिवासी जाणीव' हा लेखकाच्या जीवनदृष्टीचा अविभाज्य भाग असलेल्या साहित्यास आदिवासी साहित्य म्हणता येईल.''[५] मुनघाटे यांनी आदिवासी या संकल्पनेच्या परिप्रेक्षात येईल अशा सर्व घटकांना येथे महत्त्व दिलेले दिसून येते. तर आदिवासी साहित्य म्हणजे साहित्य आरंभाची आग्रपायरी आहे. ''समस्त साहित्याचा आरंभ आदिवासी साहित्याने झाला आहे. आजचे लोकसाहित्य म्हणजे आदिवासी साहित्य असून लोकसाहित्याचा निराळा विचार करण्याची आवश्यकता नाही.''[६] अशी भूमिका डॉ. तुकाराम रोंगटे मांडतात. परंतु आदिवासी साहित्याचा विचार करताना साठोत्तर कालखंडातील वाङ्मयीन परिप्रेक्ष ध्यानात घ्यावे लागते असे मुनघाटे यांना वाटते.

''आदिवासी साहित्य हे आदिवासींच्या अस्तित्वाइतकेच आदिम असले तरी आदिवासी मराठी साहित्याचा विचार करताना साठोत्तरी व्यवस्था विरोधी बंडखोर चळवळींचा विचार करणे भाग आहे.''[७] या पार्श्वभूमीवर डॉ.विनायक तुमराम यांची भूमिका अतिशय निराळी आहे.

आदिवासी साहित्याला आज जरी मराठी साहित्यातील एक प्रवाह म्हणून मान्यता असली तरी डॉ. विनायक तुमराम यांच्या मते, ''आदिवासींच्या अनेक बोलीभाषा आज अस्तित्वात आहेत. आदिवासी भाषासमूह विश्वव्यापक, अतिप्राचीन व समृद्ध आहे. वयाने मराठीतून निश्चितच मोठा पण दुर्दैवाने दुर्लक्षित व उपेक्षित ! आदिवासी बोली भाषा व मराठी भाषा यांच्या उद्गमाचा शोध घेतल्यास प्राचीन कोण? आधी कोण ? हे प्रश्न उद्भवतात. आदिवासी बोलीभाषा या मराठीच्या आधीच्या व अत्यंत प्राचीन आहेत हे या प्रश्नाचे सरळ उत्तर होय. रूप-गुणांनी व शब्दधनाने त्या मराठीहून कमी नाहीत. मग अशा बोलीभाषांमधून अवतरलेल्या साहित्याला मराठी वाङ्मयातील प्रवाह का व कसे मानायचे? आज बहुतेक आदिवासी साहित्य मराठी भाषेतून पुढे येत आहे, म्हणून काय



Scanned by CamScanner

त्याला मराठी साहित्यातील केवळ एक प्रवाह संबोधायचे? हा तर त्याच्या स्वातंत्र्याला बाधा आणणारा नकार ठरेल.''[८] आदिवासी साहित्याच्या स्वातंत्र्याचा उद्घोष करणारी मांडणी तुमराम यांनी केली आहे. असे असले तरी भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाबरोबरच समांतर घडलेल्या समाजसुधारणेच्या चळवळी काही प्रमाणात का असेना ग्रामीण – दलित साहित्याबरोबरच आदिवासी साहित्याला प्रेरक ठरल्या हे नाकारता येणार नाही. मराठीचे सौंदर्यशास्त्र व भाषाशास्त्र यांचे उपयोजन आदिवासी साहित्याच्या संदर्भात कसे करायचे हा तुमराम यांनी उपस्थित केलेला प्रश्न रास्त असला तरी आदिवासी साहित्याचा अवकाश मराठी वाङ्मयापासून पूर्णतः तोडता येणार नाही हेही वास्तव आहे. दलित – ग्रामीण साहित्यप्रवाहांपेक्षा आदिवासी साहित्याचा प्रवाह सर्वस्वी वेगळा आहे हे मान्यच करावे लागेल.

**आदिवासी साहित्याच्या प्रेरणा :**

आदिवासी मानवसमूह आदिम काळापासून निसर्गाच्या सान्निध्यात जगत आला आहे. अन्न-वस्त्र-निवारादी सर्व मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी हा समूह निसर्गावर अवलंबून राहिलेला आहे. त्याच्या जीवननिष्ठा निसर्गाशी एकरूप झालेल्या आहेत. मौखिक परंपरेतील लोकसाहित्याचा विचार करता त्यातील वर्णन वरून आदिवासींची निसर्गनिष्ठा स्पष्ट दिसून येते. त्यामुळे आदिवासी साहित्याची निसर्ग हीच प्रथम प्रेरणा आहे हे सर्व अभ्यासकांनी मान्य केले आहे.

आदिवासी साहित्याची दुसरी प्रेरणा म्हणजे आदिवासी संस्कृती. निसर्गाच्या सान्निध्यात आदिवासींच्या प्रथा-परंपरा आणि संस्कृतीची जडणघडण झाली आहे. ही संस्कृती कमालीची समृद्ध आहे. चित्रकला, संगीत, विणकाम, नृत्यकला, गायन-वादन याबरोबरच स्वतःची भाषा, लोककथा, लोकगीते अशी मौखिक वाङ्मयाची संपन्न दालने या संस्कृतीत आहेत. कोणत्याही प्रकारचे शोषण, हिंसा आणि कुठल्याही मानवसमूहाचे हक्क किंवा स्वातंत्र्यावर घाला घालून या संस्कृतीचे पोषण झालेले नाही. आर्य-अनार्य संघर्षामुळे या संस्कृतीचे नुकसान झाले. तरीही निसर्गाच्या आश्रयाने या संस्कृतीचा समृद्ध प्रवाह विकसित होत राहिला. त्यामुळे आदिवासी साहित्याची प्रेरणा म्हणून या संस्कृतीकडे पाहावे लागते.



Scanned by CamScanner

आदिवासींचा इतिहास ही देखील आदिवासी साहित्याची एक महत्त्वाची प्रेरणा होय. आदिवासी वीर पुरुषांच्या एतिहासिक कर्तृत्वाचा परिचय आदिवासी साहित्य लेखनासाठी फार मोलाचा ठरला असल्याची नोंद डॉ. विनायक तुमराम यांनी केली आहे. आदिवासी वीर पुरुषांचे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक योगदान मोठे आहे. स्वातंत्र्यलढ्यातील बाबुराव सेडमाके, वीर बिरसा मुंडा, सिद्धु कान्हु संताळ, तंट्या भिल्ल यांचे योगदान आता सर्वश्रुत झाले आहे. गोंडवनात गोंडी साम्राज्याची पायाभरणी करणारा गोंडराजा कोलभिल्ल, बल्लाळशहा, बावनगडचा पराक्रमी राजा संग्रामसिंह या आदिवासी वीर पुरुषांच्या कर्तृत्वातून आदिवासी साहित्याने सातत्याने प्रेरणा घेतली आहे.

आधुनिक काळातील मानवमुक्तीचे लढे ही देखील आदिवासी साहित्याची प्रेरणा म्हणावी लागेल. यासंदर्भात प्रा. विनोद कुमरे म्हणतात, ''१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि नंतर बहुजनांच्या आणि दलितांच्या उद्धारासाठी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून उदयाला आलेल्या सामाजिक चळवळी आदिवासी साहित्याला प्रेरक ठरल्या आहेत. आदिवासी साहित्य चळवळीच्या प्रेरणेत बहुजन आणि दलित चळवळीचा सिंहाचा वाटा आहे हे मान्य करावेच लागते.''[९]

जागतिकीकरणानंतर निर्माण झालेल्या समस्या, आदिवासीच्या संदर्भातील जटिल प्रश्न, यातून निर्माण होणारी अंतर्मुखता आणि चिंतनशीलता देखील आदिवासी साहित्यासाठी प्रेरक असल्याचे दिसून येते.

**आदिवासी साहित्याचे स्वरूप व वाटचाल :**

आदिवासी साहित्याच्या वाटचालीचा विचार करताना लोकसाहित्याला नजरेआड करून चालत नाही. आदिवासी समाजाची सांस्कृतिक धारणा, रूढी, परंपरा, प्रथा, श्रद्धा, समजुती, सण-उत्सव, देवदैवते यासंबंधीचे लोकसाहित्य मौखिक परंपरेने चालत आलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी साहित्यात आदिवासी जीवनासंबंधीचे चित्रणही काही प्रमाणात आढळून येते. यात शंकर भिसे यांची १९४५ रोजी प्रसिद्ध झालेली 'जंगलातील छाया', वि.वा.हडप यांची १९४७ साली प्रसिद्ध झालेली 'गोदाराणी' ही कादंबरी , यांचा उल्लेख करावा लागतो. पुढे मधु मंगेश कर्णिक यांची 'वाडगीण', दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरी', गो. नी.दांडेकर यांची 'जैत रे जैत' अशा कादंबऱ्यांमधून



Scanned by CamScanner

आदिवासींचे जीवन चित्रण येत राहिले.

साठच्या दशकानंतर शहरी जीवनाशी संबंध आलेल्या नवशिक्षित आदिवासी वर्गाला आपल्या अस्मितेचा शोध घेण्याची प्रेरणा मिळाली. त्यातून आदिवासी कवींच्या कविता प्रकाशात आल्या. भुजंग मेश्राम यांचा 'आदिवासी कविता' हा कवितासंग्रह १९८५ साली प्रकाशित झाला. पुढे आदिवासी कवी वाहरू सोनवणे यांचा 'गोधड' (१९८७), डॉ. विनायक तुमराम यांचा 'गोंडवन पेटले आहे' (१९८७), भुजंग मेश्राम यांचा 'उलगुलान' (१९९०) आदी कवितासंग्रह प्रकाशित झाले. नव्वदोत्तर कालखंडात उषाकिरण आत्राम, कुसुम आलम, सुनील कुमरे, माधव सरकुंडे ते आजच्या काळातील आघाडीचे आदिवासी कवी तुकाराम धांडे यांच्यापर्यंत आशय आणि अभिव्यक्तीने प्रगल्भ कविता आदिवासी साहित्यात लिहिली जाऊ लागली.

कथा, नाटक या वाङ्मयप्रकारातही नव्वदोत्तर कालखंडात लेखन होऊ लागले. या कालखंडाच्या पूर्वीच १९७२ साली प्रसिद्ध झालेले विश्वनाथ खैरे यांचे 'एकलव्य' हे तीन अंकी नाटक आदिवासी जीवनातील अटळ संघर्षाचे प्रखर चित्रण करणारे ठरले. डॉ. गोविंद गारे, मोतीरावण कंगाली, व्यंकटेश आत्राम आदींनी आदिवासी जीवनावरील वैचारिक लेखन केले. डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासी साहित्य चळवळीला दिशा देण्याचे कार्य केले. १० नोव्हेंबर १९७९ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथे तुमराम यांच्या पुढाकाराने आदिवासींचे पहिले साहित्य संमेलन भरवण्यात आले. या संमेलनाने आदिवासी साहित्य चळवळीला प्रारंभ झाला. आज डॉ. एकनाथ साळवे, डॉ. मधुकर वाकोडे, प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्यासारखे आदिवासी जीवनाचे अभ्यासक कादंबरीकार लेखन करत आहेत.

डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासी साहित्य चळवळीबरोबरच आदिवासी साहित्यसमीक्षेचाही प्रारंभ केला आहे. तुमराम यांचे आदिवासी साहित्यासंबंधीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्याबरोबरच मोतीरावण बंगाली या अभ्यासकाने आदिवासींच्या आदिम भाषांच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. श्रीमती उषाकिरण आत्राम यांचेही योगदान महत्त्वाचे आहे. डॉ. प्रमोद मुनघाटे हे नव्या पिढीतील साहित्यिक- समीक्षक आदिवासी साहित्यचळवळीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.



Scanned by CamScanner

## आदिवासी समाज आणि साहित्यापुढील आव्हाने :

प्रथम आदिवासी समाजापुढील आव्हानांचा विचार करू. आर्य-अनार्य संघर्षातील नंतर या समाजाच्या दैन्यावस्थेला प्रारंभ झाला. हे दुःख आणि दैन्य आजही आदिवासींची पाठ सोडत नाहीत. सर्व बाजूंनी उपेक्षा, अवहेलना, शोषण यामुळे आदिवासी समाज पुरता नागवला गेला आहे. या समाजासमोरील आव्हानांमध्ये नक्षलवाद, अंतर्गत जातीय उतरंडीचे निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, विस्थापन, कुपोषण, दारिद्र्य, बेरोजगारी, जंगल आणि जमीनीवरील आदिवासींच्या मूलभूत हक्काचे रक्षण अशा अनेक प्रश्नांचा अंतर्भाव आहे.

### नक्षलवाद :

''आदिवासी समाजासमोर गेल्या अर्धशतकापासून नक्षलवादी चळवळीचे फार मोठे आव्हान आहे. कारण या चळवळींमुळे वर्षानुवर्षे आदीवासींचा मोठा संहार होत आला आहे. मरणारा आणि मारणारा दोन्हीही आदिवासी आहेत. त्यामुळे त्या समाजातील शांततेचा भंग झाला आहे. या आव्हानासंदर्भात आदिवासींच्या उत्थानासाठी कार्यरत असणाऱ्या डॉ. गणेश देवी यांचे विचार महत्त्वाचे ठरू शकतात. भारतातल्या आदिवासींचे जीवन जो कोणी जवळून बघेल त्यास आदिवासींच्या उद्धारासाठी हिंसेची कास पकडण्याची अनिवार्यता वाटली नाही तर नवल. त्यांना नाडण्याचे, लुटण्याचे व लुबाडण्याचे काम इतक्या विविध स्वरूपात व प्रचंड प्रमाणात चाललेले आहे, की शांततेच्या मार्गाने ही परिस्थिती बदलता येणे अशक्य वाटावे. तथापि माझ्यापुरता प्रदीर्घ विचार करून मी या निर्णयावर आलो आहे, की हिंसेच्या मार्गाने गेल्यास आदिवासींचे जीवन आता आहे त्यापेक्षा जास्त वेदनामय होईल. वैचारिक पातळीवर तसेच प्रत्यक्ष कृतीत मी नक्षलवादी व दहशतवादी विचारधारेस विरोध करतो. हिंसेची परिणती केवळ प्रतिहिंसेतच होते व तेही राज्य संस्थेसारख्या मुळातच हिंसक प्रवृत्तीच्या संघटनेने चालवलेल्या अमानुषी प्रतिहिंसेत होते.यापेक्षा आदिवासींच्या विकासासाठी स्वावलंबित ग्रामराज्याची निर्मिती करणे अत्यंत निकडीचे आहे.''[१०] देवी यांनी मांडलेला स्वावलंबित ग्रामराज्याचा उपाय आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अतिशय उपयुक्त ठरू शकतो.



Scanned by CamScanner

**जमीन व जंगल हक्क :**

गेल्या दोन शतकांत आदिवासींच्या झालेल्या पीछेहाटीचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा जमिनीवरचा नाहीसा होत गेलेला सार्वभौम हक्क. वेगवेगळ्या जंगल कायद्यांनी आदिवासींची शेतजमीन सीमित होत गेली. यामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नांची भीषणता अधिक वाढली. अहिंसेच्या मार्गाने या प्रश्नावर संघटित चळवळ उभी करण्याचे आव्हान त्यामुळे निर्माण झाले आहे.

**अंधश्रद्धा व जातीय उतरंडीचे निर्मूलन :**

आदिवासी समाजात शैक्षणिक जागृती हळूहळू होऊ लागली आहे. जादूटोणा, पशुबळी, देवदेवस्कीवरील विश्वास याबद्दल जागरुकता निर्माण करण्याचे आव्हान आदिवासींपुढे आहे. त्याबरोबरच आदिवासींमधील गोंड, बुरुड, परधान, वारली, भिल्ल, ही जातीयतेची उतरंड आदिवासींच्या सांस्कृतिक धारा करत आहे. या विरोधात लढण्याचे आव्हान या समाजासमोर आहे.

**सांस्कृतिक सपाटीकरणात सत्त्व टिकवण्याचे आव्हान :**

मूलतत्त्ववादी शक्तींचा वाढता प्रभाव हा विविधतेने नटलेल्या भारतासाठी कायमच चिंतेचा विषय ठरला आहे. स्वतःच्या प्रथा-परंपरा व सांस्कृतिक निराळेपण टिकविण्याचे आव्हान यामुळे निर्माण झाले आहे. आदिवासींचे 'हिंदुकरण', 'ख्रिस्तीकरण', 'इस्लामीकरण' भूतकाळात मोठ्या प्रमाणात घडून आले आहे. ही प्रक्रिया आजही सुरू आहे. अशा गंभीर परिस्थितीत स्वतःचे सांस्कृतिक निराळेपण टिकून ठेवण्याचे आव्हान आदिवासी समाजासमोर आहे.

**आदिवासी साहित्यापुढील आव्हाने :**

आदिवासी बोलींचे संवर्धन - जागतिकीकरणानंतर प्रादेशिक भाषांच्या संदर्भाने अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. अशावेळी आदिवासींच्या बोली टिकवण्याचे फार मोठे आव्हान आदिवासी साहित्यासमोर उभे आहे. आदिवासींचे होत असलेले विस्थापन हा यातील प्रमुख अडथळा दिसून येतो.

**प्रबोधनपर साहित्याची निर्मिती :**

आदिवासी समाजातील अनिष्ट रूढी प्रथा परंपरांच्या निर्मूलनासाठी आदिवासी साहित्यात प्रबोधनपर साहित्याची निर्मिती होणे गरजेचे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन, आधुनिक काळाचा अन्वयार्थ लावण्याच्या दृष्टीने हे साहित्य उपयुक्त ठरू शकते.



Scanned by CamScanner

## आदिवासी साहित्य अनुवाद :

आदिवासी साहित्यातील जीवनानुभव, जाणिवा पूर्णतः निराळ्या आहेत. निसर्गप्रेरित असे हे साहित्य आहे. अनुवादाच्या माध्यमातून हे साहित्य वैश्विक पातळीवर पोहोचवण्याचे आव्हान आदिवासी साहित्यासमोर आहे. असे प्रयत्नही अलीकडच्या काळात सुरू झालेले दिसून येतात परंतु त्याची व्यापकता कमी आहे.

## आधुनिक माध्यमांच्या वापरातून साहित्यप्रसार :

आधुनिक काळात छापील पुस्तकांचे महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले आहे. साहित्य प्रसारासाठी नवनव्या साधनांचा होत असलेला वापर हेही त्याचे कारण म्हणावे लागेल. यासंदर्भात समकाळातील आघाडीचे आदिवासी कवी तुकाराम धांडे यांचे उदाहरण देता येईल. युट्यूबच्या माध्यमातून तुकाराम धांडे यांची कविता वैश्विक पातळीवर पोहोचलेली दिसून येते. या साधनांच्या वापरामुळे आदिवासींचे भावविश्व, संस्कृती, सद्यस्थिती, व्यथा-वेदना, समस्या प्रभावीपणे समाजाच्या समोर मांडल्या जात आहेत. 'उलगुलान एक साहित्य चळवळ' या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून माध्यमातून आदिवासी साहित्य सर्वदूर पोहोचवण्याचे कार्य सुरू आहे. ही एक आश्वासक बाब म्हणावी लागेल. नागरी समाज यांच्या हातातील ही सर्व साधने आदिवासी समाजाने आपल्या हातात घेऊन आपल्या विकासाचे मार्ग निर्माण करण्याची गरज आहे.

## समारोप :

आदिवासी समाज, साहित्य आणि आव्हाने या विषयावरील चर्चेअंती या भूमीवरील मूलनिवासी आदिवासी समाज आणि त्याचे साहित्य यांच्या विकासाच्या दृष्टीने प्रस्थापित समाज आणि साहित्याला समर्पक भूमिका घ्यावी लागेल वाटते. ही भूमिका घेतली तरच आदिवासींच्या सद्यस्थितीत काही विधायक फरक पडू शकेल. जागतिकीकरणाच्या लाटेत आदिवासींचे निसर्गनिष्ठ, नैतिक मूल्यव्यवस्थेची पाठराखण करणारे साहित्य मानव आणि निसर्ग यांच्यातील आदिम संबंधांची सतत जाणीव करून देत राहील यात शंका नाही.

## संदर्भग्रंथ :

१) तुमराम विनायक, आदिवासी साहित्य (लेख), ''साठोत्तर मराठी वाङ्मयातील प्रवाह''(ग्रंथ), संपा.लिंबाळे शरणकुमार, दिलीपराज प्रकाशन,



Scanned by CamScanner

पुणे,२००७, पृ.२२९.
२) सुमनोहर,आदिवासी साहित्य (लेख), ''साठोत्तर मराठी वाङ्मयातील प्रवाह''(ग्रंथ), संपा.लिंबाळे शरणकुमार, दिलीपराज प्रकाशन, पुणे,२००७, पृ.२४४.
३) साकुळकर माधुरी, आदिवासी स्त्री : भीषण वर्तमान -क्षेत्रीय अध्ययन (लेख), ''आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या'' (ग्रंथ), संपा. मुनघाटे प्रमोद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, पृ. १३४, १३५.
४) पूर्वोक्त, पृ.१३६.
५) मुनघाटे प्रमोद, प्रस्तावना, ''आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.०३.
६) रोंगटे तुकाराम, ''आदिवासी साहित्य, संस्कृती आणि इतिहासाच्या पाऊलखुणा'' (व्याख्यान), उलगुलान एक साहित्य चळवळ-युट्युब चॅनेल,१३ जानेवारी २०२१.
७) मुनघाटे प्रमोद, प्रस्तावना, ''आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या'', प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.०१.
८) तुमराम विनायक, आदिवासी : जीवन, कला आणि साहित्य (लेख), ''आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या'' (ग्रंथ), संपा. मुनघाटे प्रमोद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, पृ.४०.
९) कुमरे विनोद, आदिवासी साहित्याची वाटचाल (लेख), ''आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या'' (ग्रंथ), संपा. मुनघाटे प्रमोद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७, पृ.८४.
१०) देवी गणेश, प्रस्तावना, ''वानप्रस्थ'' (ग्रंथ), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, दु.आ.२००७, पृ.०२.

***



Scanned by CamScanner

पुस्तकाबद्दल....

हे पुस्तक उत्कृष्ट लेखकांचे मौल्यवान विचार व त्यांचे विचारप्रवर्तक लेख निवडून व संकलित करून संपादकांनी घेतलेल्या दिर्घोद्योगी परिश्रमची फलश्रुती आहे. हे पुस्तक वाचन आणि लायब्ररी सेवांबद्दलच्या प्रत्येक गोष्टीशी संबंधित असलेल्या विचारांचे स्पेक्ट्रम आहे, जेणेकरुन तरुण पिढीमध्ये वाचन संस्कृतीची बीजे रुजवली जावीत. हि तरुणपिढी आपणास अनेकदा सोशल मीडियामध्ये उत्साहाने रमलेली, व्हॉट्सअॅप, फेसबुक मधील बनावट मेसेज वाचनाचे व्यसन जडलेली आणि पुस्तके वाचण्याचा तिटकारा करणारी दिसून येते. या पुस्तकात वाचनाच्या महत्त्वापासून ते वाचनाच्या न्यूरोलॉजीपर्यंत, ग्रंथालय सेवेपासुन ते व्यक्तिमत्त्व विकासापर्यंतचे विविध विषया संबंधीचे लेख आहेत. विकसनशील तरुण मनांना ज्ञानाचा छोटासा प्रवाह अनुभवण्यासाठी हे पुस्तक नक्कीच फायदेशीर ठरेल. हे पुस्तक बहुविद्याशाखीय आहे कारण ते सर्व विषयांशी संबंधित आहे आणि विविध विषयांशी संबंधित असलेल्या लेखकांनी त्यात बहुमोल योगदान दिलेले आहे. बहुविद्याशाखीयता हा एक घटक आहे कि ज्यावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अधिक लक्ष केंद्रित केले गेलेले आहे कारण एखाद्याला शक्य तितक्या विषयांची पुरेशी माहिती असणे ही काळाची गरज आहे. हे पुस्तक वाचकांना वाचनाबद्दलच्या बहुविद्याशाखीय दृष्टिकोनांशी परिचित होण्याची संधी देईल तसेच प्रस्तुत ग्रंथ विद्यार्थी, अभ्यासक ,संशोधक यांच्यासाठी संदर्भ ठरेल यात काही शंकाच नाही.



प्रा.योगेश बी. डफळ सध्या श्री पद्ममणी जैन महाविद्यालय, पाबळ, पुणे, महाराष्ट्र येथे २००९ पासून महाविद्यालयीन ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत. ते विज्ञान पदवीधर- (बीएस्सी भौतिकशास्त्र) आहेत आणि नंतर त्यांचे एम.एल.आय.एस्सी. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे झाले आहे. ते एम.एल.आय.एस्सी मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सुवर्णपदक विजेते आहेत. तसेच त्यांना त्याच्या महाविद्यालया तील सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार व इतर अनेक पुरस्कार मिळाले आहेत .त्यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाची सेट परीक्षा देखील उत्तीर्ण केली आहेत . त्यांनी पीअर-रिव्ह्युड, आणि यूजीसी-केअर संशोधन जर्नल्स मध्ये १५ हून अधिक संशोधन लेख प्रकाशित केले आहेत व विविध पुस्तकात ५ प्रकरण लिहिली आहेत. तसेच त्यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रातील अनेक व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आणि कार्यशाळेत भाग घेतला आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये/सेमिनारमध्ये भाग घेतला आणि शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी लायब्ररी वेबसाइट्स डेव्हलपमेंट, इन्स्टिट्यूशन रिपॉझिटरी-डीस्पेस इन्स्टॉलेशन आणि कस्टमायझेशन, लायब्ररी सॉफ्टवेअर्स, लायब्ररी अँड्रॉइड अॅप्लिकेशन, डिजिटल लायब्ररी इत्यादी विषयात व्याख्याने दिली आहेत.


**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431 126 (Maharashtra)
Mob.09850203295

Co-Publisher
**Shri Padmamani Jain**
**Arts and Commerce College, Pabal,**
Tal-shirur, Dist-Pune, Maharashtra, India
Pin-412403

ISBN :978-93-85882-33-3


ग्रंथ वल्ली आम्हा सोयरी

# ग्रंथ वल्ली आम्हा सोयरी

प्रा. योगेश बी. डफळ



# ग्रंथ वल्ली आम्हा सोयरी

© प्रा. योगेश भगवान डफळ

❖ **Publisher :**
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Co.-Publisher :**
**Shri Padmamani Jain College, Pabal,**
**Tal. Shirur, Dist. Pune-412403**

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**
H.P. Office (Source by Google)

❖ **Edition:** January. 2021

**ISBN** 978-93-92584-70-1

❖ **Price : 200/ -**

All Rights Reserved. No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

08) करवीर नगर वाचन मंदिरः करवीर नगरीचा सांस्कृतिक ठेवा
डॉ. विजयकुमार कुंडलिक जगताप, मुंबई
||58

09) वाचन कौशल्य
प्रा. कुलथे प्रविण रमेश, सायखेडा, ता. निफाड,
जि. नाशिक. ||72

10) वाचनसंस्कृती विकासामध्ये सातारा जिल्हयाचे योगदान
सौ. जिरगे आशा चंद्रशोक, सातारा. ||79

11) वाचनसंस्कृती विकासामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर
सौ. स्मिता प्रकाश पाटोळे, सातारा ||94

12) सोशल नेटवर्किंग माध्यमे व ग्रंथालय
श्री. कोकणे प्रकाश पांडुरंग, नेवासा,
जि. अहमदनगर ||101

13) वाचन संस्कृती विषयक समाजभान आणि आजचा युवक
प्रा. डॉ बेग रेहानाआरा ईस्माइल, पाबळ. ||106

14) व्यक्तिमत्व विकास आणि भाषा
प्रा. डॉ. हनुमंत भवारी, पाबळ.
ता. शिरूर जि. पुणे. ||114

15) "वाचाल तर वाचाल"
श्री. निलेश बाळासो सस्ते, बारामती ||124

16) २१ व्या शतकात डिजिटल ग्रंथालयाची आवश्यकता
डॉ. प्रतिभा लक्ष्मण वराडे, मलकापूर. जि. बुलढाणा.
||129

10

# ''वाचनसंस्कृती विकासामध्ये सातारा जिल्हयाचे योगदान''

**सौ. जिरगे आशा चंद्रशोक**
ग्रंथपाल, सावित्रीबाई फुले महिला
महाविद्यालय, सातारा.

***********

**प्रस्तावना :**

भारतातील शिक्षण व्यवस्थेचा विचार करता असे लक्षात येते की, प्राचीन काळापासून भारताला ज्ञानाचा आणि संस्कशतीचा वारसा लाभलेला आहे. मानवाला विचार करण्याची शक्ती असल्याने तो आपले विचार, भावभावना, कल्पना, अनुभव व ज्ञान आपल्या स्मशतीत साठवून ठेवतो व त्याचा सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीस देतो. हा वारसा पुढे देण्यासाठी विविध साधनांचा उपयोग मानवाने केलेला दिसून येतो. अगदी सुरुवातीला भाषा अस्तित्वात नव्हती तेव्हा संभाषण व्यवहार सांकेतिक खुणांच्या आधारे, भाषा अस्तित्वात आल्यानंतर मौखिक स्वरुपात, लेखनकला अस्तित्वात आल्यानंतर, चित्रांच्या आधारे करत.

मुद्रणपूर्व कालखंडात विद्यार्थी ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरुगशही जात असत आणि पाठांतराच्या माध्यमातून ज्ञान पुढच्या पिढीकडे संक्रमित केले जात असे. लेखनकलेचा शोध लागल्यानंतर मानवाने वेगवेगळे धातू, विटा, झाडांच्या साली यांचा उपयोग करुन आपल्याजवळील ज्ञान संग्रहीत करुन ठेवले. यातूनचा ग्रंथ या संकल्पनेचा

जन्म झाला आणि ग्रंथाचे जतन करण्यासाठी मानवाच्या या प्रयत्नातूनच ग्रंथालयांची निर्मिती झाली. मुद्रणकलेचा शोध ही मानवाच्या इतिहासातील सर्वात मोठी क्रांती, या शोधाने मानवाचे जीवनमान बदलून गेले. ग्रंथालयामध्ये संग्रहीत असलेले ग्रंथरुपी ज्ञान वाचनाच्या माध्यमातून प्रसारीत होत गेले आणि यातूनच वाचनसंस्कृती चळवळ उदयास आली.

आपल्या प्राचीन संस्कृतीत ज्ञानाचा अमर्याद खजिना निरनिराळ्या पोथ्या, पुराणे, धार्मिक ग्रंथ, वेद, उपनिषदे यामध्ये आहे. हे ज्ञान शिक्षणाचा अभाव व अद्ययावत साधनांची उपलब्धतता नसल्यामुळे पूर्वी मुठभर शास्त्रीपंडितांच्या हाती होते. त्याकाळी निरक्षर समाजाची संख्या जास्त असल्याने सामूहिक वाचनातून, वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमातून हे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीत. वाचनाचा मक्ता काही सुधारलेल्या सुशिक्षित समाजापुरताच मर्यादित होता. आज शिक्षण समाजाच्या सर्व घटकापर्यंत पोहोचले आहे. परंतु माहिती तंत्रज्ञान, प्रसार माध्यमे यांच्या अतिवापरामुळे प्रत्यक्ष वाचन कमी झालेले दिसून येते. ब्रिटिश काळांत इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून नवशिक्षितांची ज्ञानाची नवीन खिडकी उघडली गेली आणि पाश्चात्य, तत्वज्ञान, विज्ञान, संस्कृती, इतिहास आणि परंपरा यांची ओळख समाजाला झाली.

- **वाचन:**

जॉन रस्किनच्या 'अन टू दि लास्ट' या पुस्तकाचा आपल्या जीवनावर विलक्षण प्रभाव पडला, पुढे यातूनच 'सर्वोदय' या संकल्पनेचा जन्म झाला, असे महात्मा गांधीनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे. जगातील बहुतेक सर्वच तत्वज्ञांनी, चिंतनशील अभ्यासकांनी, साहित्यिकांनी ग्रंथानाच गुरु मानले आहे. औपचारिक शिक्षणापेक्षा बेंजामिन फ्रॅकलिनने आपल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण वाचनात घालवला आणि अनुभव विश्व संपन्न केले. यावरुन असे दिसून येते की, पुस्तके आपल्या आयुष्यावर, विचारांवर प्रभाव पाडतात.

''स्वयं विकासाकडे नेणारी, जीवनातील मानसिक उदासिनता दूर करण्यास मदत करणारी व मानवाची भावनिक व बौध्दिक भूक

भागविणारी मानवी कश्ती म्हणजे वाचन होय''. प्रत्येक ध्वनी, अक्षर आणि त्यांच्या समूहामागे लिहिणा—याच्या मनातील अर्थ उभा असतो. तो जाणून घेऊनच म्हणजेच आकलनासह केलेले ध्वनी उच्चारण म्हणजे वाचन.

डॉ. श.कृ. सोहोनी कृत शैक्षणिक टिपा कोशात वाचनाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे, ''वाचन म्हणजे लिखित संकेतांचा अर्थपूर्ण अवबोध! यात शब्दांची प्रत्यभिज्ञा, प्रवाह, आकलन इ. समावेश होतो, तर वाचन कौशल्यात शब्दज्ञान, आकलन/अर्थग्रहण व अस्खलित वाचन यांचा समावेश होतो.

वाचन हे केवळ विरंगुळा म्हणून किंवा आवड म्हणून केले जाऊन नये, तर स्वत:ला अद्ययावत ठेवण्यासाठी केले जावे. आताच्या या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी माहिती हे फार मोठे साधन असल्याने वैचारिक प्रगल्भतेसाठी वाचनासारखा दुसरा पर्याय नाही.

पुस्तके म्हणजे मानवी संस्कश्तीच्या प्रवाही सातत्याचे, ज्ञानाचे, रंजनाचे, संवादसंपर्काचे, अनुभवांच्या संक्रमणाचे माध्यम म्हणून महत्वपूर्ण आहेत आणि वाचक हा या माध्यमाचा संवाहक आहे. यामुळेच वाचाल तर वाचाल' ही म्हण आजच्या घडीला किती समर्पक आहे हे आपण सर्वच जाणतो. आजच्या मनुष्याच्या ठिकाणी असणारे ज्ञान ही त्याची खूप मोठी ताकद आहे. याच्या मदतीने तो सुबुद्ध आणि प्रगल्भ तर होतोच, परंतु त्याच्या एकूण कार्यावर त्याचा परिणाम होतो. मनोरंजनाची साधने वाढल्याने मागील पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प झालेले दिसून येते. कारण वाचनाव्यतिरिक्त रेडिओ, टेलिव्हिजन, मोबाईल, संगणक, चित्रपट, नाटके, यांच्यामुळे मनुष्याला वाचण्यासाठी निवांतपणाच मिळेनासा झाला आहे. आजच्या घडीला आपल्या मोबाईल फोनवरसुद्धा विशिष्ट नंबर फिरविल्याबरोबर जगामध्ये घडणा—या घटनांची माहिती मिळत आहे.

- **वाचनाचे महत्वः**

वाचन माणसाला परिपूर्ण बनण्यासाठी मदत करते. वाचनाने बहुशुश्रूता वाढते.जिज्ञासापूर्ती होते, भाषाकोश समश्ध्द होवून शब्दांचे

विविध प्रकारचे उपयोग समजतात, कल्पनाशक्तीचा विकास होतो, वाचनकौशल्याशी संबंधित अशा इतर कौशल्याचा विकास होतो, संस्कृतीची व परंपरेची ओळख होते. वॉल्टर डी ला मेयर म्हणतात,^Reading May Be one of life's inexhaustible pleasures and blessing*-

वाचनाचे महत्व सांगताना कविवर्य बा.भ. बोरकर म्हणतात, ''माझा आणि पुस्तकांचा ॠणानुबंध जडला होता. कुणी मला निराशेत आशेचे किरण दाखवले होते, कुणी माझ्या निद्रिस्त प्रतिमेला जाग आणली होती, कुणी माझ्या जखमेवर गार पाण्याची धार धरली होती, कुणी माझ्या अंधारलेल्या जीवनपथावर ऐनवेळी प्रकाश पाडला होता, कुणी माझे हरवलेले बाल्य परत आणून दिले होते, कुणी माझ्या तारुण्याला वेळोवेळी उजाळा दिला होता, तर कुणी माझ्या झोपाळू ध्येयवादास वरच्यावर अंकुश लावला होता''.

उपरोक्त संदर्भानुसार असे लक्षात येते की, लेखक आपल्या कल्पनेच्या जोरावर आपले साहित्य निर्माण करीत असतात. तर वाचक आपल्या वाचन कौशल्याच्या आधारावर ते साहित्य, कल्पनाविश्व पुन्हा निर्माण करीत असतो. त्यामुळे वाचन ही एक सर्जनशील कलाच म्हटली पाहिजे. ज्याला एकदा चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकीला सीमा नाही. ज्याला आपला काळ सोडून भूतकाळ किंवा भविष्यकाळात प्रवेश करावयाचा असेल त्याला पश्थ्वीवरील आजपर्यंत कोणत्याही देशात झालेले मोठे मोठे तत्ववेत्ते, कवी, नाटककार असेल त्याला वाचनाखेरीज दुसरे साधन नाही.

- **वाचनसंस्कार:**

संस्कृतीपेक्षा संपत्तीला प्राधान्य देण्याच्या वृत्तीमुळे मानवी जीवनात ताण तणाव वाढत आहते. तसेच आज समाजात चाललेले मूल्यहीन राजकारण, भडक करमणूक यामुळे आजची तरूण पिढी भरकटत चालली आहे. संस्कृती जपण्यासाठी वाचन संस्कार गरजेचे आहे. एक नितीमान समर्थ आणि राष्ट्र उभारणीत छोटे छोटे योगदान देणारा जबाबदार नागरिक घडवायचा असेल तर तो माहिती संपन्न असून

चालणार नाही तर त्यास ज्ञानसंपन्न बनावे लागेल, ज्ञानी बनावे लागेल. यासाठी वाचनाला पर्याय नाहीद्य तसेच ज्ञानधारित अर्थव्यवस्था आपल्याला उभारावी लागते. सुखी संपन्न सुरक्षित सभ्य सुशिक्षित सुस्कृत समाजासाठी वाचनसंस्कश्तीची जोपासना करणे महत्वाचे आहे.

वाचनाचा संस्कार हा व्यक्तिच्या मनावरील महत्वाचा संस्कार आहे. आजच्या आधुनिक युगात संगणक प्रणालीचा वापर खुप प्रमाणावर होत आहे. आजची तरूण पिढी मोबाईल, फेसबुक, Whatsapp, Twitter, Instagram या सामाजिक माध्यमात गुंतून गेले आहेत. काळानुसार हे जरी आवश्यक असले तरी दैनंदिन काही प्रमाणात वाचन लेखन घेणे तितकेच गरजेचे आहे. भावी पिढी संस्कारीत व सक्षम होण्यासाठी त्यांच्यावर बालवयापासूनच वाचन संस्कार होणे आवश्यक असते. त्यामुळे संस्कार जेवढे चांगले तेवढी तरूणपिढी संस्कारी होते. त्याचबरोबर त्यांची वैचारिक पातळी वाढते.

आज जगातील अगाध असे ज्ञान वाचकांपर्यत पोहचण्यासाठी वाचनाची आवड असणे आवश्यक आहे. वाचनाचा संस्कार हा बालकाच्या मनावरील महत्वाचा संस्कार आहे. अतिशय चांगले ज्ञान विविध मान्यवरांची चरित्रे, अनेक छोटया गोष्टी, कथा गीतामधून मुलांवर चांगले संस्कार होऊ शकतात. तत्वज्ञ 'इमर्सन' म्हणत असे, 'थोर माणसांशी संभाषण करण्याची संधी मिळाली तर त्यांचे आवडते ग्रंथ विचारून घ्या'. मनाच्या समाधानासाठी सुखासाठी संस्काराची फार गरज असते. वाचनातून मुलांच्या मनावर चांगले संस्कार होतात.

वाचाल तर वाचाल असा सुविचार आपण नेहमी ऐकतो वाचत असतो. हे वाक्य जरी साक्षरतेसंबधी असले तरी त्यातून दिला जाणारा संदेश महत्वाचा आहे. वाचनामुळे व्यक्तींचे अनेक गोष्टीबाबत अज्ञान दुर होते. अध्ययन सखोल तसेच सुलभ होते. वाचन करणा—या व्यक्ती दुस—यांना देखील आनंद देतात. पुनःपुन्हा केलेल्या वाचनाने स्मरण वाढते, वाचन हे आत्मविकास करणारे स्वतःला ओळख करून देणारे साधन आहे.

इंटरनेट, माहिती तंत्रज्ञानातील क्रांती व भ्रमनध्वनी, फोन

अशी संपर्क साधनांची सुलभता इ.मुळे माहिती मिळवणे सोपे झाले आहे. तसेच माहितीचे आदानप्रदान मोठया प्रमाणावर होते आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी माहिती हे प्रभावी अस्त्र आहे. त्यामुळे वैचारिक प्रगल्भतेसाठी वाचनासारखा दुसरा प्रभाव पर्याय नाही. काळाचं प्रतिबिंब संस्कशतीत पडलं की, साहित्य देखील त्या प्रतिबिंबातले आपले अस्तित्व डोकावून बघायचा प्रयत्न करतं, त्यामुळे काळाप्रमाणे बदलणारे साहित्य वाचकांना आवडते. वाचनाची गोडी लावायची असेल तर मराठी भाषेतील अभिजात साहित्यकशतींची यादी नव्या वाचकांना मिळणे आवश्यक आहे. वाचनाचे महत्व सांगेल तेवढे थोडेच वाटते. एकंदरित वाचनाने व्यक्तिचा व्यक्तिमत्व विकास होऊन सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

- **वाचनसंस्कृती :**

आपल्या आयुष्यावर दोन गोष्टींचा प्रभाव जास्त पडतो, एक आपले मित्र आणि दुसरे म्हणजे पुस्तक. मग पुस्तकालाच आपला मित्र बनवलं तर ! थोर लेखक Richard Steel म्हणतात, 'Reading is to the mind what exercise is to the body'. जिथे वाचन होते तिथे विचार होतात आणि हेच विचार आपल्याला आपले ध्येय ठरवायला आणि गाठायला मदतही करतात. पुस्तकातून ज्ञान आणि ज्ञानातून संपत्ती निर्माण होत असते. वाचनामुळे आपले भावविश्‍व, अनुभवविश्‍व विस्तारते. जगातले सर्व अनुभव आपण घरबसल्या घेऊ शकतो आणि एकाच जीवनात अनेक आयुष्य जगू शकतो. आपण पूर्वीपासूनच आपला सांस्कृतिक वारसा लिखित साहित्याच्या वाचनातून जतन करत आलो आहोत. जगात जर कोणती संस्कृती श्रेष्ठ असेल तर ती म्हणजे वाचन संस्कृती. वाचन संस्कृतीची नाळ प्रत्येक माणसाशी प्राचीन काळापासून जोडली गेली आहे. ''वाचनाचा लळा, फुलवी जीवनाचा मळा हे अगदी खरं आहे. कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी ग्रंथांचे व वाचनाचे महत्त्व अतिशय सुरेख वर्णन केले आहे ते म्हणतात,'या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती, ग्रंथ शिकविती माणुसकी अन ग्रंथ शिकविती शांती' चला तर मग एक पाऊल पुढे टाकूया वाचन

संस्कृती जतन करण्यासाठी'!

अलीकडे हा वाचन संस्कारच घराघरातून हरवला आहे. आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या काळात टिकाव धरण्यासाठी बालवर्गापासून परीक्षा, टक्केवारी याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे क्रमिक पुस्तकाव्यतिरिक्त इतर वाचन करण्याची विद्यार्थ्यांची प्रवृतीच नष्ट झालेली दिसून येते. पालकही याबाबत उदासीन झाले आहेत. शाळा, परीक्षा, शिकवणी वर्ग आणि डॉक्टर किंवा इंजिनिअर बनण्याची दुर्दम्य आकांक्षा त्यातून निर्माण होणारी जीवघेणी स्पर्धा, त्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी वाट्टेल त्या मार्गाचा अवलंब या सर्व दुष्टचक्रात आताचा विद्यार्थी आणि पालक अडकलेले दिसून येतात. वेळ काढून परीक्षा निरपेक्ष, निखळ आनंद देणारे वाचन करण्यास त्यांना वेळच मिळत नाही. केवळ वाचणारे, वाचनाबद्दल बोलणारे, लिहिणारेच लोक ज्या समाजात असतात, त्याला फक्त 'वाचक समाज'म्हणतात. केवळ मोठ्या प्रमाणात वाचन करणा—या समाजामध्ये 'वाचनसंस्कृती' असेलच असं नाही.

- **वाचनसंस्कश्तीची व्याख्या:**

प्रा. वेंडी ग्रिसवोल्ड म्हणतात,'' जो समाज सांस्कृतिक सक्षमता आणि आर्थिक यशासाठी पुस्तक—वाचनाची क्षमता आणि सराव ही अनिवार्य गरज मानतो, तो 'वाचनसंस्कृती' असलेला समाज म्हणून ओळखला जातो''

ग्रिसवोल्ड यांना केवळ बुद्धिजीवी वर्गाच्या नोकरीतली प्रतिष्ठा आणि त्यासाठी त्यांना करावं लागणारं वाचन अभिप्रेत नाही. एकंदर समाजातल्या सर्व घटकांमधल्या व्यक्तींना त्यांच्या—त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातल्या नोकरीसाठी अत्यावश्यक असणारं वाचन अभिप्रेत आहे. मराठीमध्ये बहुतांश वेळा 'वाचन संस्कृती' या शब्दाचा वापर 'वाचन' या शब्दाचा समानार्थी वा पर्यायी शब्द म्हणूनच केला जातो, असे दिसते. संस्कृती ही समान रीतीरिवाजांच्या समूहात घडत असते. ती घडते तेव्हा मानवी समूहाचा उदय झालेले असते. वाचन संस्कृतीमुळे समाजमनाची प्रगती होते. पुस्तकाचे प्रकाशन, त्यांची खरेदी—विक्री

यांचा संबंध वाचनसंस्कृती वाढण्याशी लावता येत नाही कारण वर्षानुवर्षे धार्मिक, आध्यात्मिक विषयांवरील पुस्तके फारशा जाहीरात आणि प्रसिद्धीविनाही खपत आली आहेत. गेल्या काही वर्षात आरोग्य, गुंतवणूक, शेअर बाजार, पाककला, करिअर नोकरी मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास व आत्मचरित्रे या प्रकारच्या माहितीपर उपयुक्त पुस्तकांना चांगली मागणी आहे. वाचन समृद्ध असले म्हणजे लेखनाचीही प्रवृत्ती प्रबल होते, कल्पनाशक्तीला, रसिकता, सृजनशीलता, सहृदयता, दुस—याच्या दुःखाची जाणीव, त्यांस आवश्यक असणारे संवेदनशील मन यांस खतपाणी मिळून आई, वडिल, समाज, राष्ट्र यांच्याशी असलेली बांधिलकी, माणूसकी, सामाजिक जाणीव समाजाबाबत, आपली काही कर्तव्ये आहेत याचे भान प्राप्त होते. मन संकुचित, क्षुद्र गोष्टी न अडकता ते विश्वात्मक होते.

- **वाचनसंस्कृती विकासामध्ये सातारा जिल्हयाचे योगदान:**

सातारा एक सर्जनात्मक वारसा लाभलेला जिल्हा होय. इथे अनेक तत्वचिंतक, इतिहासकार, साहित्यिक, पत्रकार, कवि जन्मास आले. जयरामस्वामी, वामन पंडित यांच्यासारखे संत तर गोविंद सागर, पठ्ठे बापूराव, आण्णाभाऊ साठे व शाहीर साबळे यांच्यासारखे शाहीर आणि रामराव चिटणीस हे बखरकार येथेच जन्मले. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, न. चिं. केळकर हे समाज सुधारक आणि द. भा. पारसनीस, रा. भ.गोडबोले, भाऊशास्त्री लेले, ग. ह. खरे, लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे ख्यातकीर्त येथेच होऊन गेले. काका कालेलकर, बा. सी. मर्ढेकर, श्री. म. माटे, वसंत कानेटकर यासारख्या साहित्यिक नररत्नांनी सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आसमंत समृद्ध केला. कृष्णा काठी वाई येथे ज्ञानसाधनेची मोठी परंपरा निर्माण झाली. विश्वकोष निर्मितीचा त्यात विशेषत्वाने उल्लेख करावाच लागेल. रवींद्र भट, अभिनेता राजा गोसावी हे इथलेच. नवभारत संशोधन पत्रिकेने आणि अन्य नियतकालिकांनी सातारा जिल्ह्याची व पर्यायाने महाराष्ट्र राज्याची मोठी सेवा केली आहे.

साहित्य, कला संस्कृतीच्या संवर्धनासाठी शासनातर्फे आजही अनेक आघाडयांवर भरघोस स्वरूपाची कामगिरी केली जात असते. यामध्ये सार्वजनिक ग्रंथालये,पुरस्कार, सार्वजनिक ग्रंथालयासांठी दिले जाणारे प्रोत्साहन, नाटय, चित्रपटांच्या विकासासाठी दिले जाणारे अनुदान, ग्रंथमहोत्सव, साहित्य संमेलने व ग्रंथप्रदर्शन अशा अनेक उपक्रमांचा उल्लेख करता येईल. यासाठी आवश्यक असणारी आर्थिक मदतही शासन करीत असते.

आजची तरूण पिढी उद्याचे होणारे भावी नागरिक असतात. भारत देश महासत्ता होण्यासाठी त्यांना चांगले ज्ञान मिळणे आवश्यक असते त्यासाठी ग्रंथमहोत्सवासारखा साहित्य उपक्रम अखंड कार्यरत ठेवायला पाहिजे. साठविलेल्या संपत्तीपेक्षा वाचलेल्या पुस्तकांतून मिळणारी मूल्ये, विचार, सामर्थ्य यांचे मूल्य अधिक असते. जीवनात प्रत्येक व्यक्तिला सुख हवे असते. आणि त्याला हव्या असणा—या सुखाची व्याख्या ही व्यक्तिपरत्वे, विचारानारूप भिन्न असते.

ग्रंथाना, संस्कारांना मश्त्यूचा शाप नसतो, तर त्यास चैतन्याचे वरदान असते. त्यातील विचारधन हे राष्ट्राचे वैभव असते. उत्तम साहित्यकश्ती या विचारांचा अमश्तठेवा असतो. समाजाचे सांस्कृतिक वैभव वाढवण्यासाठी प्रतिभावंताची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर सातारा जिल्हयाचे वाचनसंस्कृती चळवळीमधील योगदान उल्लेखनीय ठरते. यामध्ये सातारा नगर वाचनालय, ग्रंथमहोत्सव, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने, वाई येथील मराठी विश्वकोशाचे कार्यालय, औंध येथील भवानी वस्तुसंग्रहालय यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

**१. सातारा नगर वाचनालयः**

प्रतापसिंह महाराजांना ग्रंथसंकलन करण्याचा छंद होता. त्यांनी स्वतःचे एक ग्रंथालय सुरु केले होते. त्यांच्यानंतर त्यांचे बंधू आप्पासाहेब यांनीही त्यांत भर घातली. त्यांच्या मश्त्यूनंतर पत्नी सगुणाबाई यांनी हे ग्रंथालय त्याच्या जागेसह जनतेच्या स्वाधीन केले. अशाप्रकारे या वाचनालयाची स्थापना ६ जुलै १८५३ रोजी झाली. सुरुवातीचे नाव

'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते. १८६६ मध्ये आणखी एका वाचनालयाचे यात विलीनीकरण होऊन 'सातारा सिटी जनरल लायब्ररी' असे नामकरण झाले.

सन १९०१साली व्हिक्टोरिया राणीच्या निधनानंतर सातारा शहरात त्यांच्या नावाने एखादे स्मारक असावे असा प्रस्ताव कलेक्टर यांनी मांडला. तो मान्य होऊन त्यासाठी रु. २००० चा फंड गोळा करण्यात आला. या फंडात पूर्वीचे कलेक्टर जे. आर. आर्थर यांच्या नावे जमविलेला रु. ४००० चा फंड व वर्गणीचे रु. २००० अशा आठ हजार रुपयात दुमजली इमारत बांधली गेली. याचे उद्घाटन ७ ऑगस्ट १९०५ साली करण्यात आले. यावेळी या वाचनालयाचे नामकरण 'व्हिक्टोरिया लायब्ररी' असे झाले. सभागृहाला 'आर्थर हॉल' असे नाव देण्यात आले. सन १९२० मध्ये तत्कालीन अबकारी कमिशनर आर्थर यांचे चिरंजीव होते. या हॉलमध्ये इंग्रज राजवटीच्या विरोधात चर्चा घडत असल्याने त्यांनी नाव बदलण्यास सांगितले. सार्वजनिक कामात सक्रीय असणारे रावबहादुर वि. ना. पाठक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या वारसांनी हा हॉल अद्ययावत करण्यासाठी रु. ८००० चा निधी दिला. यामुळे या हॉलचे नामकरण 'पाठक हॉल' असे करण्यात आले.

सन १९३८ मध्ये स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणात जनतेच्या मागणीमुळे याचे नाव बदलून 'नगर वाचनालय' असे केले गेले. सन १९४९ मध्ये सरकारने ' मुक्तद्वार जिल्हा वाचनालय' म्हणून मान्यता दिली. या संग्रहालयाचे अनेक नावांत रूपांतर करून वेगवेगळे नामकरण केले गेले ते खालीलप्रमाणे:

- नेटिव्ह जनरल लायब्ररी
- १८६६पासून सातारा सिटी जनरल लायब्ररी
- १९०५पासून व्हिक्टोरिया लायब्ररी
- १९३८ पासून नगर वाचनालय
- २००७ श्री छत्रपती महाराज (थोरले) नगर वाचनालय.

अनेक प्रतिथयश व्यक्तींच्या घडणीत या वाचनालयाचे योगदान

आहे. शिवाजीराव भोसले, दत्तप्रसाद दाभोलकर, म. वि. कोल्हटकर इ. चा यात समावेश होतो.

सातारा शहरात जिल्हा ग्रंथालय १, तालुका निहाय १, आणि इतर अ ब क ड दर्जाची एकुण ३८ ग्रंथालये आहेत. वाचनाची आवड असणारे वाचक सर्व प्रकारची पुस्तके विकत घेऊन वाचू शकत नाहीत. अशावेळी त्यांच्या मदतीला येते ते ग्रंथालय. यशस्वी झालेल्या अनेक व्यक्तींच्या जीवनात ग्रंथालयांनी, पुस्तकांनी मोलाची भूमिका बजावली आहे. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र उभारणीत ग्रंथांचे योगदान महत्वाचे आहे.

**२. सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवः**

वाचन संस्कृती वाढवण्यासाठी व ती टिकवण्यासाठी सामाजीक पातळीवर काही प्रयत्न केले जातात, त्यातील एक म्हणजे ग्रंथ महोत्सव. वाचकापर्यंत वाचकांना हवी असणारी पुस्तके मिळावित त्यांची माहिती मिळावी यासाठी ती पुस्तके किंवा नवीन प्रकाशित होणारी पुस्तकांची माहिती घेण्यासाठी ग्रंथाचे प्रदर्शन भरविणे व त्यातून विकत घेण्याची सोय उपलब्ध करून देणे म्हणजे ग्रंथमहोत्सव.

ग्रंथमहोत्सव हे शाळा, महाविदयालयांच्या दृष्टिने सुवर्ण संधीच असते. कारण शाळा कॉलेजमध्ये दरवर्षी ग्रंथालयासाठी पुस्तके विकत घेतली जातात. ती घेण्यासाठी प्रकाशकांकडे दुकानात जावून घ्यावी लागतात. व ती घेण्यासाठी दरात तडजोड करावी लागते. ग्रंथमहोत्सवात अनेक प्रकाशक एकत्रित येत असतात. अनेक प्रकाशकांची नवीन प्रकाशनाबाबत माहिती मिळते व खरेदी करणे शक्य होते तसेच यात अनेक प्रकाशक येत असल्याने त्यात स्पर्धा असल्याने ग्राहकांना सुट मिळणे शक्य असते. ग्रंथ हे गुरू असतात. त्यापेक्षा ते मित्र अधिक असतात. पुस्तक हे केवळ शब्दसंपदा वाढवण्यास मदत करणारे साधन नसून पुस्तक हे अनुभवांसह कल्पनांचे, आशा—आकांक्षाचे क्षितीज निर्माण करणारे साधन आहे. पुस्तके आपल्याला सकारात्मक विचार करायला प्रवृत्त करतात. त्यामुळे मानवाच्या कमकुवत मनाला धीर येतो. वाचनाची सवय एकदा

लागली की माणूस मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात गुंगून जातो. त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस आत्महत्या, हत्या असे प्रकार करण्यापासून परावृत्त होतो.

सातारा शहरात गेली १७वर्षे ग्रंथमहोत्सव भरत आहे. २१ जानेवारी २०००साली जिल्हा परिषद मैदान येथे प्रथम आयोजन केले होते. या ग्रंथमहोत्सवातील स्टॉल रचना ही सर्व प्रकाशकांना समान संधी उपलब्ध होतील अशी असते. सर्व स्तरातील वाचक आपली वाचन विषयक तहान भागवण्यासाठी या ग्रंथमहोत्सवास भेट देतात. आयुष्यभर टिकणारे ज्ञान ग्रंथातुन मिळते. ज्ञानाचा मुळ आधार ग्रंथ आहे. बहुतांशी लोक ग्रंथ घरात ठेवत नाहीत. प्रत्येक माणुस घराच्या खर्चाचे नियोजन करतो, मात्र ग्रंथखरेदीसाठी महिन्याच्या बजेटमध्ये तरतुद करत नाहीत. वाचकांना बरीच पुस्तके हवी असतात.परंतु ती कशी व काठे मिळणार याचे कोडे असते. मात्र ग्रंथमहोत्सव या उपक्रमाने ही संधी उपलब्ध होत असते.

### ३. साहित्य संमेलने:

ग्रंथ प्रसाराला चालना मिळण्याच्या हेतूने, तसेच त्यावर एकत्र येऊन विचार विनिमय करण्याच्या हेतूने न्या. रानडे यांनी लोकहितवादींच्या सहकार्याने १८७८ च्या मे महिन्यात ग्रंथकारांना एकत्र आणण्याचे ठरविले. त्यासाठीचे आवाहन ज्ञान प्रकाश (७ फेब्रुवारी १८७८) मधे प्रसिद्ध झाले आणि या आवाहनानुसार ११मे १८७८ रोजी सायंकाळी पुण्याच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले. याला पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन समजले जाते. या संमेलनाचे अध्यक्षपद न्या.रानडे यांनीच भूषविले. साहित्य कला संस्कृतीच्या संवर्धनासाठी शासनातर्फे राबवण्यात येणा-या उपक्रमापैकी एक म्हणजे साहित्य संमेलन होय. अशा कार्यक्रमांत संमेलनाची ठिकाणे अगोदरच ठरविली जातात. कवी संमेलन, समिक्षक असे अनेक कार्यक्रम यात असतात. अखिल भारतीय मराठी साहित्य समेंलन आयोजनाला ९४ संमेलनाची व सुमारे शतकोत्तर शतकाहुन अधिक काळाची परंपरा लाभली आहे.

४. **महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ :**

मराठी विश्वकोश या सर्व विषय संग्राहक ज्ञानकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना दि.०१ डिसेंबर, १९८० रोजी करण्यात आली. विश्वकोश म्हणजे एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर मराठीतील सामान्यातील सामान्य माणसापर्यंत ज्ञान पोहोचविण्यासाठी ग्रंथरुपी चळवळ, विश्वातील सारे शब्द, त्यामागचा इतिहास, भूगोल, तत्वज्ञान, विज्ञान मराठीतून ज्ञानार्थींना मिळावे हा उद्देश आहे. या मंडळातर्फे मराठी भाषेत विश्वकोशांचे संपादन व प्रकाशन कार्य चालू आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ स्थापन झाले होते त्याचे विभाजन करण्यात येऊन हे मंडळ एक राज्यस्तरीय मंडळ म्हणून स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. तेव्हापासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मंडळाचे अध्यक्ष व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक आहेत. मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची नेमणूक राज्यशासनातर्फे दर तीन वर्षांनी करण्यात येते. विश्वकोशाचे संपादन कार्यालय वाई येथे आहे. विश्वकोश कार्यालयात विज्ञान व तंत्रविद्या, मानव्य, कला व प्रशासन अशा चार शाखा असून त्यात सु. ५०संपादकीय कार्यकर्ते काम करतात. विश्वकोशाचे ग्रंथालय अद्ययावत असून त्यात ३६ हजारांहून अधिक संदर्भग्रथ आहेत. विश्वकोशाच्या छपाईसाठी राज्य शासनातर्फे वाई येथेच एक खास मुद्रणालय स्थापन करण्यात आले आहे. मराठी विश्वकोशाचे आतापर्यंत १ते २० खंड प्रकाशित झाले आहेत. उर्वरित ४ खंडाचे संपादन—प्रकाशन चालू आहे. मराठी विश्वकोशाचे १ ते २० खंड महाजालकावर तसेच छापील स्वरूपात आणि सी.डी., पेनड्राईव्ह या स्वरूपात देखील उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. मुलांचा विश्वकोश या योजनेखाली बालविश्वकोश आणि कुमारविश्वकोश प्रत्येकी १२ खंडात तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून कुमारविश्वकोश खंड २ ते ११ चे संपादन—प्रकाशन करण्याचे काम प्राधान्याने सुरु करण्यात आले आहे.

५. औंध येथील भवानी वस्तुसंग्रहालय

औंध वस्तुसंग्रहालय सातारा व कोल्हापूर या मुख्य शहरांना जोडणारे औंध हे गाव संस्कृतीचे अनेक अवशेष आजही जनत करुन आहे. त्यात आठ हजारापेक्षा जास्त वस्तू असलेले हे वस्तुसंग्रहालय १९३८ साली बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी बांधले. विविध प्रदेशात निर्माण झालेली व त्या त्या प्रदेशाची वैशिष्टये सांगणारी ऐतिहासिक चित्रे, संगमरवरातून कोरलेली शिल्पे, कोरीव काम केलेल्या धातूच्या व लाकडच्या वस्तू, हस्तीदंती कोरीव कलाकृती आणि स्ट्राँगरुम मधील मौलिक ऐतिहासिक रत्ने यांचे दुर्मिळ दर्शन या ठिकाणी पहावयास मिळते.हे वस्तु संग्रहालय आज महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभागाच्या ताब्यात आहे. दरवर्षी हजारो पर्यटक या वस्तुसंग्रहालयाला भेट देतात.

सारांशः

माहिती, ज्ञान आणि मनोरंजनाच्या अंगभूत गुणांमुळे 'ग्रंथ हेच गुरु' असे म्हटले जाते. बौध्दीक आणि सामाजिक विकासासाठी ग्रंथ आणि ग्रंथालयांचे अनन्यसाधारण महत्व आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीचा केवळ उक्तीतून उद्घोष न होता ती कृतीतून प्रत्ययास आणण्याचे कार्य पुस्तकांच्या रुपाने होऊ शकते. आजच्या पिढीवर असे संस्कार करण्यासाठी पुस्तकांशिवाय दुसरे प्रभावी माध्यम नाही. वाचनामुळे माणसाला माणूस म्हणून असलेल्या अस्तित्वाचे मोल किती अनमोल आहे याचे भान प्राप्त झाल्याशिवाय राहात नाही. माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करत आपण वाचन संस्कृतीची जनजागृती केली. पुस्तकांविषयी ही कायमची ओढ तरुणांच्याही मनात निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

संदर्भः

१. राजगुरु, मेघमाला:वाचनकौशल्य (२०१०), पुणे, उन्मेष.
२. पोरे, सतिशः वाचनसंस्कार(२००९), पुणे,पद्मगंधा.
३. नाईक, मनोहर:वाचनकला, वक्तृत्व कला (१९९९),औरंगाबाद,

जयविकास.

४. सोहनी, श.कृ.: शैक्षणिक टिपाकोश (१९८७), मुंबई, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ.

५. पाटील, दिनकर: ग्रंथ महोत्सव(२०११),पुणे, संस्कृती.

६. https://www.dainikprabhat.com/the-changing-reading-culture-of-the-new-age/

७. https://marathi.momspresso.com/parenting/7eb7e5e24b1648a8a5b14a644e657c75/article/vachana-samskrriti-kalachi-garaja-qhem0k9juyvr

८. https://www.aksharnama.com/client/article_detail/745

❑❑❑

M52 एम. ए. (अर्थशास्त्र)

COURSE CODE : ECO113

BOOK CODE : ECO1134

ECO113

कृषी अर्थशास्त्र

पुस्तक ४

# कृषी वित्तपुरवठा

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

Course Code : ECO113 Book Code : ECO1134 : कृषी वित्तपुरवठा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन

प्र. संचालक : डॉ. प्रवीण घोडेस्वार, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

**लेखक**

डॉ. शिवाजी भोसले
सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख
अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले
महिला महाविद्यालय, सातारा

**आशय संपादक**

डॉ. रमेशचंद्र बेराड
माजी संचालक
अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ एम.बी.ए.
संगमनेर, जि. अहमदनगर

डॉ. समाधान पाटील
सहयोगी प्राध्यापक आणि प्रमुख
अर्थशास्त्र विभाग, तुळजाराम चतुरचंद
महाविद्यालय, बारामती

**भाषिक व अनुदेशन संपादन**

डॉ. उमेश राजदेरकर
माजी संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. शायिन शेख
शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्याम कांबळे
सहायक प्राध्यापक आणि प्रमुख
अर्थशास्त्र विभाग, सरस्वती मंदिर नाईट
कॉलेज ऑफ कॉमर्स अँड आर्टस्, पुणे

**शिक्षणक्रम संयोजक**

डॉ. शायिन शेख
शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

**निर्मिती**

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

© २०२१, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- प्रथम मुद्रण : ऑगस्ट २०२१ ❑ प्रकाशन क्रमांक : २४४७
- मुखपृष्ठ रेखाटन : श्री. अविनाश भणे
- अक्षरजुळणी : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक – ८
- मुद्रक व प्रकाशक : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ISBN978-93-92982-48-4

B21-22-68

| दूरशिक्षण केंद्र, | सहकाराचा विकास |
|---|---|
| शिवाजी विद्यापीठ, | बी. कॉम. भाग-३ |
| कोल्हापूर | |

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | घटक क्र. | |
|---|---|---|
| | सत्र-५ | सत्र-६ |
| **डॉ. एस. एस. शेजाळ**<br>जी. ए. कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली | १ | - |
| **डॉ. के. एस. पवार**<br>सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड | २ | - |
| **डॉ. आर. एफ. मुजावर**<br>एल. बी. एस. कॉलेज, सातारा | ३ | - |
| **डॉ. पी. के. टोणे**<br>दहिवडी कॉलेज, दहिवडी, जि. सातारा | ४ | - |
| **डॉ. व्ही. एम. कुंभार**<br>धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, सातारा | - | १ |
| **डॉ. आर. जी. कोरबू**<br>डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर | - | २ |
| **डॉ. डी. एन. वाघमारे**<br>डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | - | ३ |
| **डॉ. यू. एम. माळकर**<br>कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पलूस, जि. सांगली | - | ४ |

■ संपादक ■

**डॉ. व्ही. एम. कुंभार**
धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त)
महाविद्यालय, सातारा

**प्रा. डॉ. डी. के. मोरे**
के. आर. पी. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

# शिवाजी विद्यापीठ,

## कोल्हापूर, महाराष्ट्र

## दूरशिक्षण केंद्र



बी. कॉम. भाग-३

(सत्र ५ व ६)

# सहकाराचा विकास

## (Co-operative Development)

(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून)

प्रगत बँकिंग भाग - ३

# बँक व्यवस्थापन पद्धती
## (Bank Management Practices)



RUBY BOOK

डॉ. विजय कुंभार
प्रा. प्रकाश टोणे

ISBN : 978-81-948788-5-2

प्रगत बँकिंग भाग-३

**बँक व्यवस्थापन पद्धती**

Advanced Banking Part III -

**Bank Management Practices**

प्रथमावृत्ती : जून २०२१

© **डॉ. विजय कुंभार**

Email :- vijay.kumbhar9@gmail.com

Cell - +919860176059

लेखक :

**डॉ. विजय कुंभार**

**प्रा. प्रकाश टोणे**

प्रकाशक :

**रूबी बुक पब्लिकेशन्स**

२२१३/१-२, सी वॉर्ड, सोमवार पेठ, कोल्हापूर

फोन : (०२३१) २६४५४५५

मुद्रक :

**श्री गजानन प्रेस**

७६ चिमणपुरा, सातारा

मूल्य : रु. १०५

Edition : 2021 ISBN : 978-93-92887-15-4

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# श्रमाचे अर्थशास्त्र

**(Economics of Labour)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२ : सत्र-३**

**अर्थशास्त्र :**

EO-21 (Optional Paper)

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०२०
एम. ए. भाग - २ करिता (श्रमाचे अर्थशास्त्र)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणा

प्रती : ८००

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

ISBN- 978-93-89327-81-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

श्रमाचे अर्थशास्त्र
एम. ए. भाग–२ : ऐच्छिक पेपर–EO-21

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| डॉ. आण्णा काका पाटील १, २<br>स. गा. म. कॉलेज, कराड | |
| प्रा. जी. सी. खामकर<br>सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा | ३, ४ |

■ संपादक ■

डॉ. संतोषकुमार यादव
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
जि. कोल्हापूर

डॉ. विजयकुमार पाटील
आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज,
आटपाडी, जि. सांगली